आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २५.०८.२०२५ | अंक नं. १२४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

Since 1965
SONI TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

बाप्पाच्या स्वागतासाठी आपण सज्ज व्हा,
सजविण्यासाठी आम्ही सज्ज आहोत..
बाप्पाला सजविण्यासाठी 500 पेक्षाही अधिक डिझाईनमधील चांदीच्या आकर्षक मुर्ती व दागिने
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# मराठ्यांना आरक्षण न दिल्यास सरकार उलथवून टाकू

## मराठा वादळ २७ ऑगस्ट रोजी मुंबईकडे कुच करणार, २९ ऑगस्टपासून आझाद मैदानात उपोषण : मनोज जरांगे पाटील



जालना - मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी २७ ऑगस्टला मुंबईच्या दिशेने कूच करण्याची घोषणा केली आहे. सकाळी १० वाजता जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघतील. त्यानंतर २९ ऑगस्ट रोजी ते मुंबईतील आझाद मैदानात पोहोचतील, असे त्यांनी २५ ऑगस्ट रोजी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. आरक्षण न दिल्यास सरकार उलथवून टाकेन, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

जरांगे पाटील पुढे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'खुन्नस' दाखवत आहेत. आजच्या दिवशी प्रेमाने सांगतो, 'आम्हाला मुंबईला जायचं नाही. तुम्ही आरक्षण दिल्यावर, आम्हाला मुंबईला जायची गरज नाही. पण अंतरवली सोडल्यावर मी कोणत्याच मंत्र्याचे ऐकणार नाही', असे मनोज जरांगे म्हणालेत.

दोन महिन्यापूर्वी मी स्वतः देवेंद्र फडणवीस यांना फोन केला होता. मला गरीब मराठ्यांच्या वेदना तुमच्या पुढे मांडायच्या आहेत, तुम्ही अंतरवालीत या, असं मी देवेंद्र फडणवीसांना म्हणालो होतो, अशी माहिती मनोज जरांगेंनी दिली. देवेंद्र फडणवीस लक्ष घालत नसतील तर आडमुठे कोण? हे मुंबईकरांनी सांगावे, असेही ते म्हणाले. तुम्ही आरक्षण न दिल्यास मी सरकारसुद्धा उलथवून टाकू शकतो... मी सोडत नसतो, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. (पुढील मजकूर पान २ वर)

### अहिल्यानगरमार्गे जाणार मुंबईच्या दिशेने

मनोज जरांगे मुंबईकडे जाण्याच्या मार्गाची माहिती देताना म्हणाले, आम्ही २७ ऑगस्टला सकाळी १० वा. आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघणार आहोत. त्यानंतर महाकाळा, शहागड, शहागड चौक, वडीगोद्री फाटा, डोंगलगाव फाटा, साष्ट पिंपळगाव, बळेगाव, आपेगाव फाटा, हिरडपुरी, आंबेटाकळी, नवगाव, तुळजापूर, वडवळी, आपेगाव माउलींचे, वाघाडी, पैठण, उंचेगाव, पाटेगाव, तळणी, शेवगाव, वडुली, मळेगाव, मिरी नाका, पांढरी पूल, अहिल्यानगरच्या शेंडी बायपासमार्गे कल्याण फाट्यावर जाणार, तेथून पुढे आळेगाव, नारायण गाव आणि २७ ऑगस्टला जुन्नरच्या शिवनेरी गडावर पोहोचणार आहेत.

२८ ऑगस्ट रोजी सकाळी शिवनेरी गडावरील पवित्र माती कपाळावर लावून राजगुरु खेडमार्गे आपण चाकणला जाऊ. तेथून तळेगाव, लोणावळा, पनवेल, वाशी, चेंबूरमार्गे २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी आझाद मैदानाला पोहोचणार. त्यानंतर २९ ऑगस्ट रोजी सकाळपासून आझाद मैदानावर उपोषण सुरू होईल. दरम्यान माळशेज घाटाचा मार्ग टाळण्यात आला आहे. मुलांना त्रास होऊ नये म्हणून प्रवासाची काळजी घेतली जाणार आहे. त्यामुळे मुंबईतील हजारो रस्त्यांपैकी कोणताही एक रस्ता सरकारने आंदोलकांना आझाद मैदानापर्यंत दिला जावा, अशी मागणी देखील जरांगे-पाटील यांनी यावेळी केली आहे.

# बाजार समितीचा चिचोंडी पाटील येथे उपबाजार

### ३० ऑगस्ट रोजी होणार भूमिपूजन

नगर - नगर तालुका बाजार समितीच्या चिचोंडी पाटील उपबाजारचे भूमिपूजन ३० ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे. यात गाळे आणि जनावराचा बाजार असेल. आपल्या मागणी नुसार येथे कांदा मार्केट सुरु करणात येईल, पण त्यासाठी आणखी जागा उपलब्ध करून घ्यावी लागेल अशी माहिती आ. शिवाजीराव कार्डिले यांनी दिली.

चिचोंडी पाटील येथील उपबाजारचा भूमिपूजन समारंभ पणन मंत्री जयकुमार रावत यांचे हस्ते व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षते खाली होणार असून उपबाजारच्या जागेची पाहणी आणि कार्यक्रमाची पूर्वतयारी बैठक येथील विवा मंगल कार्यालयात आमदार शिवाजीराव कार्डिले यांच्या मार्गदर्शनात पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सुळ, संचालिका मनिषा घोरपडे, रामदास सोनवणे, हरिभाऊ कर्डिले, संतोष म्हस्के, संजय गिरवले, सुधीर भापकर, दत्ता तापकीरे, भाऊ भोर, मधुकर मगर, राजु आंबेकर, सुभाष निमसे, धर्मनाथ आव्हाड, भाऊसाहेब ठोंबे, राजेंद्र बोथरा, निलेश सातपुते, विष्णू खांदवे, सुधीर भद्रे, बाजार समिती चे सचिव अभय भिसे, बाळासाहेब लबडे, संदिप शिंदे, शाम घोलप, बाजीराव हजारे, अशोक कोकाटे, सचिन ठोंबरे, बाबासाहेब काळे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक सचिव अभय भिसे यांनी केले. केले त्यात उपबाजारच्या आराखड्या विषयी माहिती दिली. यावेळी शेतकऱ्याच्या वतीने विष्णू खांदवे यांनी परिसरातील नागरीकांतर्फे कांदा मार्केट सुरु करण्याची मागणी केली. बाजार समिती चे सभापति भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सुळ यांनी मार्गदर्शन केले. सुधीर भद्रे यांनी आभार मानले. (छायाचित्र पान २ वर)

बाई/मुलगी पाहिजे
सारसनगर येथे कामासाठी बाई/मुलगी पाहिजे
(वय १८ ते ४५)
8888576576

हायलाईट्स ऑफ राजस्थान
Just 39000 ६ दिवस
उदयपूर, चित्तोडगड, पुष्कर, जयपुरसह
सर्व समाविष्ट विमान प्रवासासह पुणे ते पुणे
चलो बॅग भरो.. निकल पडो...
राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे
98500 63432, 70837 09473

# जीवघेण्या 'डीजे'वर कायमस्वरूपी बंदी हवी

नगर - सर्वोच्च न्यायालयाने डीजे वाजवण्यावर निर्बंध आणले आहेत, तर मुंबई उच्च न्यायालयाने डीजेवर याआधीच बंदी घातली आहे. ही बंदी कायम ठेवून गणेशोत्सवादरम्यान डीजे अथवा डॉल्बी वाजवलयास मंडळावर कडक कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने नुकतेच दिले आहेत. कौटुंबिक कार्यक्रम असो वा सांस्कृतिक किंवा एखादा सार्वजनिक उत्सव वा महापुरुषांची जयंती आणि पुण्यतिथी अशा ठिकाणी लोकांची गर्दी जमवायची असेल, तर डीजे वाजलाच पाहिजे असे काहीसे समीकरण गेल्या काही वर्षांत तयार होऊ लागले आहे. प्रचंड आवाजामुळे ध्वनी प्रदूषणासह आरोग्याची हानी करणारा डीजे हळूहळू आधुनिक संस्कृतीचा अविभाज्य भाग बनू लागला आहे. पळ;पळ;ल;विकल;मार्च-एप्रिल महिन्यात लगीन सराई जोमाने होती अशा ठिकाणी मित्र परिवाराला खुश करण्यासाठी मद्यपानाच्या मेजवान्यांसह थिरकण्यासाठी वरातीत डीजेची सोय केली गेल्याचे अनेक ठिकाणी पाहायला मिळाले. मुंबईसारख्या ठिकाणी गल्लीबोळांतही डीजे वाजू लागला कि कार्यक्रम कोणाचा आहे हे न पाहता नाचण्यास उत्सुक असणाऱ्या मंडळींचे पाय डीजेच्या आवाजाच्या दिशेने वळताना पाहायला मिळतात. डीजेची व्यवस्था करायची तर खर्चही अधिक येतो, अशावेळी बाकीच्या खर्चाशी तडजोड करून डीजेला प्राधान्य देणारी मंडळीही हल्ली बरीच पाहायला मिळतात. सार्वजनिक उत्सव, महापुरुषांच्या जयंती आणि पुण्यतिथी यानिमित्ताने काढल्या जाणाऱ्या मिरवणुका यांमध्ये डीजे वाजवणे जणू अनिवार्यच झाले आहे. एखाद्या देवतेच्या गाण्याने वाजायला सुरुवात करणारा हा डीजे हळूहळू रंगात येऊन कधी 'मुन्नी बदनाम हुई', 'एक बोतल व्होडका काम मेरा रोज का' यांसारख्या गाण्यांवर सरकतो हे कळतही नाही आणि या मिरवणुकीत चित्रविचित्र अंगविक्षेप करत नाचणारी मंडळीही अशी गाणी वाजू लागली की अधिक जोमाने धिंगाणा घालू लागतात. आपण कोणत्या महापुरुषाच्या मिरवणुकीत नाचतो आहोत, त्यांची शिकवण काय, आपल्याला असे थिरकताना पाहून त्या महापुरुषांच्या आत्म्याला किती वेदना होत असतील याचा तिळमात्र विचार या मंडळींकडून केला जात नाही. गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत मंगलवाद्यांसह काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत मोजकीच मंडळी दिसतील मात्र ज्या मिरवणुकीत डीजे वाजवला जातोय, अशा ठिकाणी आजूबाजूला हजारोंचा समुदाय पाहायला मिळतो.

डीजेमुळे आरोग्यावर होणाऱ्या भयंकर परिणामांमुळे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच डीजे वाजवण्यावर बंधने आणली आहेत. मिरवणुकीत डीजे वाजवण्यास स्वतंत्र परवानगी घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. डीजेच्या आवाजाला ४० डेसिबल्सची मर्यादा घालून देण्यात आली आहे; मात्र ही मर्यादा सर्वत्रच ओलांडली जाते. नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींची दाखल घेत अनेक वेळा या डीजेंवर पोलिसांकडून कारवाईही केली जाते, तरीही डीजे वाजवणाऱ्यांचे प्रमाण काही कमी झालेले नाही. नुकत्याच पार पडलेल्या दहीकाला उत्सवाच्या निमित्ताने मुंबई, ठाणे आणि पुणेसह अनेक शहरांत लाखोंची बक्षिसे मिळवून देणाऱ्या दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या. त्यापैकी जवळपास ९० टक्के हंड्या या राजकीय मंडळींनी पुरस्कृत केलेल्या होत्या. यातील बहुतांश हंड्यांमध्ये चढ्या आवाजात डीजे वाजत होते. अनेक हंड्यांना मुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळातील नेतेमंडळींनीही भेटी दिल्या; मात्र डीजेवर असणाऱ्या बंदीचा या सर्वांनाच विसर पडला होता. डीजेचा आपल्याला त्रास नको म्हणून काही मंत्र्यांनी चक्क कानात कापसाचे बोळे भरल्याचे काही पत्रकारांनी टिपले. आपलाच विचार करणारी ही मंडळी सामान्य जनतेचा विचार केव्हा करणार आहेत (पुढील मजकूर पान २ वर)

पाचवे पुण्यस्मरण



वटवृक्ष होतास तुम्ही,
पारंब्या होतो आम्ही...
वटवृक्ष अचानक कोसळुनी,
सावली गेली आमुची हरवूनी..
नयनात फक्त उरले अश्रू,
अन् स्मरणात आठवणी...

स्व.दिलीप गौरीलाल खंडेलवाल
जन्म : १८/८/१९६३ । मृत्यु : २५/८/२०२०
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली!
दुःखांकित
संदेश दिलीप खंडेलवाल । तिलक दिलीप खंडेलवाल

| तिलक इलेक्ट्रॉनिक्स | मनोज इलेक्ट्रॉनिक्स | कृष्णा इलेक्ट्रॉनिक्स |
| --- | --- | --- |
| एम.आय.डी.सी. | रामचंद्र खुंट | सर्जेपुरा |
| प्रिया वॉच रामचंद्र खुंट | ओमप्रकाश ट्रेडिंग कंपनी | खंडेलवाल स्टील एम.आय.डी.सी. |

समस्त खंडेलवाल परिवार

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
An ISO 9001:2015 Certified DISHA COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

बाळ आजारी आहे का?
ते वारंवार आजारी असणे | नेहमी सर्दी, खोकला
वारंवार होणारा बाल दमा | वारंवार जुलाब होणे
प्रतिकारशक्ती कमी असणे | वजन, उंची कमी
या तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
*सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
*सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
संपर्क : मो. ९५११११०४४४
डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds
अक्षय मुलांचे हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, अ.नगर

# गृहिणी

## आरोग्य

मेथ्या खाण्याची पद्धत मेथ्यांचे दाणे कच्चे खाऊ नयेत. त्या भिजलेल्या किंवा मोड आलेल्या स्थितीतच खाव्यात.

४ चमचे मेथ्या वाटीभर पाण्यात रात्री भिजत घालाव्यात आणि सकाळी उठल्यावर त्या चावून खाव्यात. त्याची चटणी करून खाल्ल्यासही त्याचे फायदे दिसून येतात.

------------------

जेवण घेताना आधी गोड खाऊ नये, असे सांगितले जाते. ते बरोबर आहे. सुरुवात नेहमी मसालेदार पदार्थाने करावी आणि शेवट गोड खाऊन करावा. त्याचे अनेक फायदे आहेत. जेवण घेताना आपल्या जेवणात गोड पदार्थ हटकून असतात, मात्र काही वेळा आपण प्रथम गोड पदार्थ खाण्यावर भर देतो. तो चुकीचा आहे. मसालेदार भोजनाच्या वेळी सुरुवात गोड पदार्थाने करू नये. साधे भोजन करताना प्रथम भात, चपाती, भाजी, दही, ताक, रायता असा क्रम असावा त्यानंतर गोड पदार्थ खावा. याबाबत महत्त्व सांगणारा एक व्हिडीओ यू-ट्यूबवर प्रकाशीत केला आहे. संगीत ऐकत भोजनाचा स्वाद कसा घ्यावा. गोड आधी का खाऊ नये. याचे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

## पाककला

### पायनॅपल मावा फ्रूट चॉकलेट

**साहित्य** - मावा ५० ग्रॅम, पायनॅपल पल्प ७५ किंवा १०० ग्रॅम (चवीप्रमाणे), २ चमचे साखर, थोडे तूप.

**कृती** - मावा तुपात भाजा. भाजत आल्यावर पायनॅपल पल्प टाका. घट्ट होईपर्यंत हलवा. नंतर २ चमचे साखर टाका. परत घट्ट होईपर्यंत मंद आचेवर परतवा. घट्ट झाल्यावर खाली उतरवा. जरा थंड झाल्यावर बारीक गोल गोळ्या करा.

जरा सुकू द्या. नंतर त्याला चॉकलेट रॅपिंग पेपरमध्ये रॅप करा. फ्रिजमध्ये १५ मिनिटे ठेवा. नंतर बाहेर काढा. फ्रूट पल्प तुमच्या आवडीप्रमाणे चिकू, ॲपल, बनाना, पेरू, द्राक्ष इ. फळांचा घेऊ शकता.

## सौंदर्य

❋ मान स्वच्छ ठेवण्यासाठी शक्यतो साबणाचा वापर करू नये. यासाठी आठवड्यातून किमान दोनदा क्लिंझिंग मिल्कच्या सहाय्याने मान स्वच्छ करावी.

❋ काकडीची पेस्ट बनवून घ्यावी. त्यात थोडं दही मिसळून मानेवर लावल्याने डाग दूर होतात.

## सल्ला

दह्याने स्नान केल्यास त्वचा स्वच्छ होतेच; पण त्वचेला ओलावा मिळतो. छोटे-मोठे डाग नाहीसे होतात.

## वास्तू

❋ एक्झॉस्ट फॅन गॅसपासून योग्य अंतरावर लावावा. गॅसवर हा पंखा असणे चुकीचे असते.

❋ घराच्या मुख्य दरवाजावर स्वस्तिक किंवा पिरॅमिड लावावे.

❋ शयनगृहातील भिंतींना हलका गुलाबी रंग असावा तसेच पडदे देखील हलक्या गुलाबी रंगाचेच असावेत.

❋ कबूतर, लव्हबर्ड्स यांच्या जोड्यांची चित्रे शयनगृहात लावल्याने पती-पत्नींचे प्रेम द्विगुणीत होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २०२५

**हरितालिका तृतीया, सामश्रावणी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, हस्त ३०।०४, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आजचा दिवस छान जाईल. मैत्रिण किंवा प्रेयसी भेटेल. मनोरंजनासाठी वेळ काढाल. एखाद्या कल्पक, सर्जनशील कार्यात गुंतलेले राहू शकता.

**वृषभ** : योजनाबद्धरीतीने आपले काम करण्याचा प्रयत्न करा. छोट्या-छोट्या अडचणी येतील. पण त्याकडे दुर्लक्ष करा. काळजीपूर्वक कार्य करा.

**मिथुन** : मनोरंजनावर खर्च होईल. पत्नीपासून उत्तम सुख मिळेल. प्रेमसंबंधात यश मिळेल. अपत्यांपासून आनंदप्राप्ती होईल. वाहनसुख मिळेल.

**कर्क** : काळजीपूर्वक कार्य करा. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळा. भागीदारीच्या विषयांमध्ये सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

**सिंह** : संवाद कायम ठेवण्याचा प्रयत्न करा. पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास लाभेल. व्यावसायिक संबंधांमध्ये ताण पडू शकतो.

**कन्या** : आपण अशा लोकांपेक्षा निराळ्या मार्गावर चालण्याची इच्छा ठेवता ज्यावर आपले सहकर्मी आपल्याबरोबर असतील. परस्पर सहकार्याचे महत्त्व ओळखणे आपल्यासाठी उत्तम राहील.

**तूळ** : थंड आणि शांत राहाण्याचा प्रयत्न करा. आर्थिक स्थितीमध्ये हळू-हळू सुधारणा येईल. **वृश्चिक** : आपण नव्या ग्राहकांना व प्रख्यात लोकांना भेटाल. शेवटी नव्या योजना आणि प्रोजेक्ट्स कार्यान्वित करणे आपल्यासाठी श्रेयस्कर ठरेल.

**धनु** : आपण इतर लोकांना देखील यासाठी तयार करू शकता. इतर लोकांना आपला विचार विकण्याची आपली योग्यता अप्रतिम आहे.

**मकर** : मित्रांबरोबर आणि इतर लोकांबरोबर काळ व्यतीत करण्याची आज आकस्मिक संधी मिळेल. गंभीरपणे विचार केलात तर एखादी बौद्धिक योजना आरंभ करू शकाल.


**कुंभ** : आनंदाची बातमी मिळेल. राजकीय विषयांमध्ये यश मिळेल. मित्रांचा आधार मिळेल. अडकलेली सरकारी कामे पूर्ण होतील.

**मीन** : चाकरमान्यांना लाभ मिळेल. आजचा दिवस कालपेक्षा चांगला असेल. तरीही आर्थिक मुद्द्यांच्या प्रश्नांबद्दल वाद होणे शक्य आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२४९

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२४८ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) मोठा; शक्तिमान; जास्त ४) खांबांवर टाकलेली आडवी तुळई ६) पाट्यावर चटणी वगैरे ज्याने वाटतात तो लंबगोल दगड ७) धनुष्य; धनुष्याकृतीसारखे केलेले बांधकाम; महिरप ९) फळातील रसाळ भाग; मगज १२) अन्नपदार्थात येणारी वाळू, मातीचे अतिबारीक कण १४) दोन किंवा जास्त शब्दांचा मिळून बनलेला एकच शब्द १७) सरळ नसलेला; वक्र १८) आत्या; मामी १९) सावली; सावट २०) तपस्व्यांची राहण्याची जागा २१) एक शेंगभाजी

**उभे शब्द :-** १) युग; हंगाम २) रक्षण करणारा; रखवालदार ३) प्रशंसा; स्तुती ४) गरम मसाल्यातील एक तिखट पदार्थ ५) घाण पाणी काढून दिलेली वाट; नाला ८) मायावी हरिणाचे रूप घेऊन सीतेला फसविणारा राक्षस १०) पाचांचा समुदाय ११) कडक पाठ असलेला एक जलचर १२) सैन्य वगैरेंचे शिस्तबद्ध संचलन १३) सुळका; खडपा १५) हार; माला; डोंगराळ जमीन १६) विविध सणांचे दिवस १८) ममता; प्रेम; लाक्षणिक अर्थाने संपत्ती १९) सुंदर; सुबक

# ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ मुलांचे विश्व ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : प्रारब्धाचा व पुरुषार्थाचा मार्ग भिन्न आहे; परंतु जेव्हा त्यांची भेट होते तेव्हा अद्‌भुत यश प्राप्त होत असते.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## अँटीबायोटीक्स म्हणजे काय?

अँटीबायोटीक्स अर्थात प्रतिजैविकांचे आजकालच्या औषधोपचारांत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कोणताही डॉक्टर प्रतिजैविकांचा उपयोग केल्याखेरीज वैद्यक व्यवसाय करूच शकणार नाही, अशी आजची परिस्थिती आहे.

अलेक्झांडर फ्लेमिंगने अपघाताने पेनिसिलीनचा शोध लावला व तेव्हापासून आजतागायत अनेक प्रतिजैविके विकसित करण्यात आली आहेत. बुरशीपासून ही प्रतिजैविके मिळतात. काही प्रतिजैविकांचे कृत्रिमरित्या तयार होणारे पर्यायही उपलब्ध झाले आहेत. प्रतिजैविके विविध मार्गांनी जंतूंचा नायनाट करतात. काही वेळी ती जिवाणूंचे पोषण त्याला मिळू देत नाहीत, कधी त्याच्या पेशीतील केंद्रकावर हल्ला चढवतात, तर कधी त्याला हानीकारक ठरणारे पदार्थ निर्माण करतात.

जिवाणूही हुशार असतात. प्रतिजैविक योग्य प्रमाणात दिले नाही वा कमी दिवस दिले, तर जिवाणूंमध्ये त्या प्रतिजैविकाविरुद्ध प्रतिकार शक्ती तयार होते.

ही प्रतिकार शक्ती त्यांच्या पुढील पिढ्यांनाही आपोआप मिळू शकते. त्यामुळे त्या प्रतिजैविकांचा उपयोग त्या जिवाणूला मारण्यासाठी करता येत नाही. असे होऊ नये यासाठी प्रतिजैविके पुरेशा डोसमध्ये निदान ५ दिवस तरी द्यायला हवी. पेनिसिलीन, अँपीसिलीन, स्ट्रेप्टोमायसीन, निओमायसीन, सेफॅलोस्पोरीन अशी प्रतिजैविके आजकाल औषधोपचारांत वापरली जातात. रोगी अत्यवस्थ असेल तर वा पचनसंस्थेतून प्रतिजैविकाचे शोषण होत नसेल तर ही प्रतिजैविके शिरेतून वा स्नायूमध्येही देता येतात. अशावेळी बावडे वा ॲलर्जीची विशेष काळजी घ्यावी लागते.

प्रतिजैविके म्हणजे रुग्णांसाठी जणू वरदानच होय. क्षयरोग, कुष्ठरोग यांसारख्या असाध्य समजल्या जाणाऱ्या रोगांपासून कॉलरा, विषमज्वर, घटसर्प, डांग्या खोकला अशा सर्वच रोगांवर प्रतिजैविकांमुळे हुकुमी उपचार करता येतात.

## जगात आंधळे किती

एक दिवस अकबराने बिरबलाला एक विचित्र प्रश्न केला. बिरबल, या जगात आंधळी माणसं जास्त असतील कि डोळस माणसं जास्त असतील?

बिरबलाने लगेच उत्तर दिले. खाविंद, अशी गणना तर कोणी केली नाही, पण माझ्या मते जगात आंधळी माणसंच जास्त असतील.

अकबराचे समाधान झाले नाही. बिरबल, जर गणना केलीच नाही तर तू कशाच्या आधारे हे सांगतो आहेस? उगाच तडक उत्तर देण्यासाठी काहीही सांगु नकोस.

दुसऱ्या दिवशी बिरबल रस्त्यावर एका चौकात आपल्या दोन सहाय्यकांसोबत जाऊन बसला. दोन्ही सहाय्यकांकडे वह्या आणि लेखणी होती. बिरबल स्वतः दोघांच्यामध्ये धान्य घेऊन जात्यावर दळत बसला. राज्याच्या वजिराला भर चौकात दळण दळताना पाहुन सर्वांना आश्चर्य वाटायला लागले आणि लोक येऊन बिरबलाला त्याबद्दल विचारू लागले. बिरबल अशा लोकांची नावे आपल्या सहाय्यकांपैकी एकाला त्यांच्या वह्यांमध्ये लिहायला सांगु लागला. पाहता पाहता हि बातमी संपूर्ण शहरात पसरली. स्वतः बादशहा अकबरापर्यंतही ही बातमी जाऊन पोहोचली. अकबराचा यावर विश्वास बसत नव्हता कि बिरबल रस्त्यावर दळण कसा काय दळतोय? अकबर स्वतः त्या चौकात बिरबलाला भेटायला आला. आणि खरंच बिरबलाला दळण दळताना पाहुन आश्चर्यचकित होत त्याने विचारले अरे बिरबल, हे तु काय करतोयस?

बिरबलाने आपल्या सहाय्यकाला सांगितले, सुरज, खाविंदांचे नाव तु तुझ्या यादीत लिही.

अकबराने दोन्ही सहाय्यकांकडे आणि त्यांच्या वह्यांकडे पाहिले. एका सहाय्यकाची वही बरीचशी रिकामीच दिसत होती. आणि अकबराचे नाव ज्यात लिहायला सांगितले ती भरत आली होती. अकबराने ती वही हातात घेऊन पाहिली. त्या वहीचे शीर्षक होते आंधळ्या लोकांची यादी.


अकबर आपले नाव या यादीत लिहायला सांगितलेले पाहुन संतापला. त्याने बिरबलाला जाब विचारला बिरबल हा काय प्रकार आहे. तुला चांगलं माहित आहे मला सगळं व्यवस्थित दिसतं, तरीही तु माझं नाव आंधळ्या लोकांच्या यादीत का लिहिलंस?

क्षमा असावी खाविंद, पण आपल्याला मी काय करत होतो हे दिसत असूनही हे तु काय करतोय बिरबल असा प्रश्न विचारला. आपल्याला समोरचं दिसत असूनही दुर्लक्ष करणाऱ्यांना आंधळंच म्हणावं लागेल ना. म्हणुन मी तुमचं नाव त्या यादीत लिहायला सांगितलं. आज इथे आल्यापासुन बहुसंख्य लोकांनी अशाच प्रकारे चौकशी केली.

फार कमी लोकांनी मी दळण दळतोय हे समजुन पुढचे प्रश्न विचारले, कि मी दळण का दळतोय, मला काही समस्या आहे का, मला खाविंदानी काही शिक्षा दिली आहे का वगैरे. फक्त अशा लोकांची नावे मी डोळस लोकांच्या यादीत लिहिली आहेत, ती यादी फारच छोटी आहे. म्हणुन मी काल म्हणालो होतो, जगात आंधळ्या लोकांचं प्रमाणच जास्त आहे असं मला वाटतं.

आपला मुद्दा पटवुन द्यायला बिरबलाने इतक्या टोकाचे प्रात्यक्षिक केल्याचे अकबराला हसु आले. तो म्हणाला ठीक आहे बिरबल, मला तुझा मुद्दा पटला. आता हे दळण सोड आणि दरबारात चल आणि तुझे खरे काम कर. मी काही दळण दळायला तुला वजीर म्हणुन नेमलेले नाही.

तात्पर्य : ज्यांना सगळे दिसूनही ते साशंक हातात त्यांना अंधच म्हणावे लागेल.



# जीवन का अमृत (भाग १)

## गुरू और परमात्मा

गर्मी के मौसम में दोपहर में और रात में भी बहुत गर्मी रहती है। बहुत सी बार गर्म हवा चलती है, चलती है और हर एक की कोशिश होती है कि वह उससे बच सके क्योंकि गर्म हवा शरीर को तंग करती है, गर्मी में रहना मुश्किल होता है और हर प्रकार की बीमारियाँ, दुःख-दर्द शुरू हो जाते हैं । इस शब्द में गुरु अर्जनदेव जी महाराज हमें यही समझा रहे हैं कि जो गर्म हवा है, उससे इंसान बचने की कोशिश करता है । लेकिन वे यहाँ बाहर की गर्मी की बात नहीं कर रहे हैं । किस तरीके से हम इस दुनिया में आते हैं ? बच्चा जब माँ के गर्भ में होता है, ९ महीने वहाँ रहता है, बहुत दुःख-दर्दों के बीच में से वह गुज़रता है । ऐसे ही पशुओं के बच्चे होते हैं, वे अधिकतर ६ महीने गर्भ में रहते हैं । जब हम इस दुनिया में आते हैं, तो शुरू से ही हम गर्मी में, गर्मी से यहाँ मतलब दुःख-दर्दों, मुश्किलों से है, कि जब हम इस दुनिया में आते हैं, तो हमारा आना ही दुःख-दर्दों से भरा हुआ है । गर्भ के अंदर बच्चे को तरह-तरह की मुश्किलों का सामना करना पड़ता है । अगर माँ ने कोई गर्म चीज़ खाई, तो उसका असर बच्चे पर होता है । माँ ने कोई ठंडी चीज़ खाई, तो बच्चे को ठंड लगनी शुरू हो जाती है । माँ ने मिर्चे खाई, तो उसका असर बच्चे पर होना शुरू हो जाता है । इस प्रकार गर्भ में आते ही हम दुःख-दर्दों को झेलना शुरू कर देते हैं । जब बच्चा पैदा होता है, तो जो पैदाइश का क्षण है, जब वह बाहर की दुनिया में आता है, माँ के गर्भ से निकल कर, तो वह process (प्रक्रिया) ऐसा है, जिस प्रकार सोने को गर्म करके, उसमें से एक एक string (तार) निकाला जाए । सोने का तार बनाने में जंत्री (छोटे बड़े छेद वाली लोहे की मोटी चादर) में से खींच-खींच कर तार बनता है । बहुत मुश्किल से बच्चा बाहर की दुनिया में आता है । जिंदगी की शुरूआत से ही हम दुःख-दर्दों से घिर जाते हैं । जैसे-जैसे हम बड़े होते हैं, हम सबके सामने कोई न कोई मुश्किल आने लगती है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

## आज्ञा चक्र

प्राचीन काल के तपस्वियों की तपस्या के बारे में हम सबने सुना है कि जब ऋषि-मुनि गुफाओ में बैठकर तपस्या करते थे, तो उनकी तपस्या का प्रभाव दूर दूर तक दृष्टिगोचर होता था । अगर कोई हिंसक प्रवृत्तिवाला व्यक्ति तपस्वी के आश्रम में अचानक प्रवेश करता, तो उसके भीतर के हिंसात्मक विचार शान्त हो जाते थे । ऐसे ही कई जगह आश्रम में कदम रखते ही मनुष्य अपना दुःख तथा गम भूल जाते थे । ऐसे भी सुना है वा चित्रों में देखा है कि कई जगह आश्रम में तपस्वी के आसपास ही हिंसक प्राणी भी आकर शान्ति से बैठ जाते हैं । कहने का भाव यह है कि तपस्या अर्थात् योग के अन्दर एक अद्भूत शक्ति समायी हुई होती है, जिससे असम्भव भी सम्भव दिखाई देता है।

यहाँ पर परमात्मा ने अति सहज योग सिखाया है । इसमें मन्त्र, प्राणायाम वा आसनों की बात नहीं है । योग का सरल अर्थ है - 'याद' । इसमें आँखें बन्द करने की आवश्यकता नहीं है । राजयोग हमें कर्मयोग की प्रेरणा देता है । इस राजयोग के अभ्यास के लिए स्वयं का और परमात्मा का ज्ञान होना अति आवश्यक है । मैं कौन हूँ ? मुझे किसके साथ योग लगाना है ? राजयोग की सही विधि है स्वयं को ज्योति बिन्दु रूप आत्मा निश्चय कर, दिव्य ज्योति बिन्दु रूप परमात्मा के साथ स्नेह और प्रेम से सर्व सम्बन्ध जोड़ना जिससे आत्मा अधिकारी बनकर परमात्मा से सर्व प्राप्तियों का अनुभव करे । आत्मा और परमात्मा के बीच सम्बन्ध जोड़ने के लिए आवश्यकता है श्रेष्ठ विचारों की । जिस प्रकार बैटरी का सम्बन्ध पॉवर हाऊस के साथ होने से बैटरी में फिर से शक्ति भर जाती है । ठीक उसी प्रकार सर्वशक्तिमान परमात्मा, जो सर्वगुणों व शक्तियों का स्रोत है, उससे समानता के आधार पर सम्बन्ध जोड़ने से आत्मा में कई गुणों और शक्तियों का संचार होता है । राजयोग की प्रथम अवस्था है - आत्म स्थिति का अनुभव करना।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

वडील : हे काय गणितात कच्चा, इंग्रजीत नापास,
मराठीत शून्य, वर्तवणूक वाईट,
अक्षर घाणेरडे.
मुलगा : बाबा, पुढे वाचा, आरोग्य चांगले आहे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❋ मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार वितरण कोणाच्या हस्ते होत असते?

- राष्ट्रपती

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

## आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

६) शिशिर ऋतुचर्या :

**ओंब्या गव्हाच्या बहु मोददायी ।**
**हुर्डा तसा शाळुहि शक्तीदायी ।।**
**काढावया घेऊनिया विळयासी ।**
**बाला तशी ये शिशिरी वनासी ।।**

शिशिर ऋतूमध्ये हेमंत ऋतूपेक्षाही अधिक थंडी वाढलेली असते. त्यामुळे या काळात शरीरातील जाठराग्नी प्रदीप्त होऊन खूप भूक लागते. म्हणून शिशिर ऋतूमध्ये गव्हाच्या ओंब्या, ज्वारीचा हुरडा खावा. हे खाल्ल्याने शरीराचे पोषण होऊन शक्ती वाढते. या काळात गहू, ज्वारी पिके काढणीला आलेली असतात. त्यामुळे खेड्यातील अनेकजण विळा घेऊन पिके कापणीला रानामध्ये जातात.

**शरीरदोष अवस्था :** हेमंत ऋतूप्रमाणेच शरीरातील दोषांची व अग्नीची अवस्था असते. या ऋतूतील थंडी हेमंत ऋतूपेक्षा जास्त असते. त्यामुळे बाह्य वातावरणातील थंडी शरीराला सहन होत नाही. त्यामुळे कफसंचय होऊन सर्दी-खोकला, दमा असे आजार क्वचित प्रसंगी उद्‌भवू शकतात.

**आहार :** हेमंत ऋतूप्रमाणेच शरीराला पोषक असा सकस व पौष्टिक आहार घ्यावा. थंडी शरीराला सहन होण्यासाठी गूळ, तीळ अशा उष्ण पदार्थांचा वापर या ऋतूत करावा. बाजरीची भाकरी उष्ण असल्याने तिचा जेवणामध्ये समावेश करावा. फक्त ती रूक्ष असल्याने लोणी किंवा तूप व तीळ लावून खावी. नैसर्गिकपणे येणाऱ्या गव्हाच्या ओंब्या, ज्वारीचा हुरडा भाजून खावा. त्यासोबत तिळाची चटणी, तिळगूळ व तीळपापडी खावी. तीळ स्निग्ध परंतु उष्ण गुणाचे असतात, म्हणूनच या ऋतूत येणारी मकर संक्रांत आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची असते. थंडीपासून शरीराचे संरक्षण करण्यासाठी संक्रांतीच्या दिवशी बाजरीची भाकरी तीळ लावून करतात व ती खातात. या ऋतूत पिकणाऱ्या सर्व भाज्या व फळे शरीराला पोषक असल्याकारणाने सर्व भाज्या व फळे एकत्र करून त्याची खेंगट भाजी बनविली जाते. चांगले आरोग्य राहण्याच्या दृष्टीने बाजरीची भाकरी व खेंगट खाणे हितकारक आहे. संक्रांतीच्या दिवशी तिळगुळाचे वाटप करतात. तिळगूळ खाणे आरोग्यास हितकारक आहे. फक्त तिळगूळ खाताना तो तीळ व गूळ यांपासूनच बनलेला खावा. साखरेपासून बनलेला खाऊ नये. भारतीय सण सर्व आरोग्याचा विचार करूनच बनलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक सणाचे शास्त्रीय महत्त्व जाणून त्यानुसार आहार घ्यावा. मांसाहार करणाऱ्या स्त्रियांनी चिकन, मटण, मासे, अंडी असा मांसाहार करावा. फक्त त्याचे प्रमाण कमी असावे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# तुळजाभवानी देवीच्या नव्या पालखीसाठी २०० वर्ष जुना पौराणिक दांडा बुऱ्हाणनगरहून राहुरीकडे रवाना

नगर – नवरात्र उत्सवाची तयारी नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरात सुरु झाली आहे. २२ सप्टेंबर पासून सुरु होणाऱ्या नवरात्रोत्सवासाठी श्रीक्षेत्र तुळजापूर येथील तुळजाभवानी देवीची सीमोल्लंघनाची नवी पालखी बनवण्यासाठी सुमारे २०० वर्ष जुना असलेला पालखीचा पौराणिक दांडा रविवारी २४ ऑगस्टला बुऱ्हाणनगरहून राहुरीकडे रवाना करण्यात आला. भाद्रपद शुद्ध प्रतिपदेच्या मुहूर्तावर बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिराचे पुजारी भगत परिवाराच्या वतीने या पौराणिक दांड्याची विधिवत पूजा व आरती करून आई राजा उदोउदोच्या गजरात बुऱ्हाणनगरहून राहुरीच्या सुताराकडे पाळणा बनवण्यासाठी रवाना करण्यात आला. राहुरीमध्ये या ऐतिहासिक दांड्याला नवी पालखी तयार करून लावण्यात येते. यावेळी बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिराचे प्रमुख पुजारी ॲड.विजय भगत व सौ.दुर्गा भगत, ॲड.अभिषेक भगत, कुणाल भगत, राजेंद्र भगत आदींसह भगत परिवार व भाविक उपस्थित होते.

पुजारी ॲड.विजय भगत म्हणाले, महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजापूरच्या तुळजाभवानी देवीच्या पालखीचा मान गेल्या एक हजारांहून अधिक वर्षांपासून अहिल्यानगर मधील बुऱ्हाणनगरच्या भगत कुटुंबाकडे आहे. दरवर्षी नवी पालखी तुळजाभवानी देवीच्या दसऱ्याच्या सीमोल्लंघना साठी नगरमधून तुळजापूर कडे जात असते. या पालखीचा दांडा हा २०० वर्षाचा जुना आहे. दरवर्षी फक्त पालखीचा पाळणाच नव्याने बनवला जातो. नव्या पालखीसाठी लागणारे सर्व साहित्य भगत परिवार राहुरीच्या सूताराला देत असते. वंशपरंपरेने एक हजार वर्षापासून भगत कुटुंबीय ही परंपरा आम्ही जपत आहे.


नवरात्र उत्सवासाठी श्रीक्षेत्र तुळजाभवानी देवीची नवी पालखी तयार करण्यासाठी पालखीचा पौराणिक दांडा बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरातून राहुरीकडे भगत कुटुंबीयांनी विधिवत पूजा करून रवाना केला.

ॲड.अभिषेक भगत म्हणाले, नवरात्री उत्सवा निमित्त तुळजाभवानी देवीच्या पालखीचा नवा पाळणा बनवून झाल्यावर राहुरी येथून तुळजाभवानी देवीच्या पालखी सोहळ्यास ७ सप्टेंबर पासून सुरवात होत आहे. ही पालखी सालाबादप्रमाणे राहुरी, पारनेर व नगर तालुक्यातील ४० गावांमध्ये जाऊन नवरात्रीच्या तिसऱ्या माळेस बुऱ्हाणनगर येथील तुळजाभवानी देवीच्या या मंदिरात येते. येथून ही पालखी श्रीक्षेत्र तुळजापूर कडे रवाना केली जाते. दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघनासाठी सक्षात तुळजाभवानी देवीच या पालखीत विराजमान होत असल्याने तेथील मिरवणुकीच्या वेळी या पालखीत देवीची कोणतीही मूर्ती किंवा फोटो ठेवला जात नाही. ज्या ४० गावांमध्ये ही पालखी जाते त्याठिकाणी यात्रा भरवण्यात येते. हजारो भाविक या पालखी सोहळ्यात सहभागी होतात.

यावेळी देवीचे पुजारी ॲड.किरण भगत, सुभाष भगत, अजिंक्य भगत, रोहन भगत, शिवानी भगत, ॲड संकेत भगत, कविता भगत, अंकिता, वैभवी, वेद, पूजा, शताक्षी व ऋषिकेश भगत आदी उपस्थित होते.

तुळजाभवानी देवीच्या पालखीचा राहुरी, पारनेर व नगर तालुक्यात होणारा प्रवास पुढील प्रमाणे :– ३१ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर राहुरी, ९ सप्टेंबर तनमर आखाडा, १० सप्टेंबर पिंपरी अवघड, ११ सप्टेंबर वांबोरी, १२ सप्टेंबर मांजरी, १३ सप्टेंबर ताठेमळा, १४ सप्टेंबर भाळवणी, १५ सप्टेंबर ढवळपुरी, १६ सप्टेंबर टाकळी ढोकेश्वर, १७ सप्टेंबर जामगाव, १८ सप्टेंबर सुपा, १९ सप्टेंबर पिंपळगाव कौडा, २० सप्टेंबर भोयरे पठार व हिवरे बाजार, २१ सप्टेंबर टाकळी खातगाव, २२ सप्टेंबर हिंगणगाव व हमीदपूर, २३ सप्टेंबर नगर शहर नालेगाव, २४ सप्टेंबर बुऱ्हाणनगर व नागरदेवळे, २५ सप्टेंबर वडारवाडी, बाराबाभळी, केकती व शहापूर, २६ सप्टेंबर रांजणी व माथणी, २७ सप्टेंबर पारगाव, भातोडी, कौडगाव, जांब व पारेवाडी, २८ सप्टेंबर दरेवाडी व वाकोडी, २९ सप्टेंबर वाणीनगर, निंबळक व नगर शहर सारसनगर, पाईपलाईन रोड येथून तुळजापूर कडे रवाना, १२ ऑक्टोबर रोजी विजयादशमीला तुळजापूर येथील श्रीसंत जनकोजी भगत यांच्या समाधी पासून देवीच्या सीमोल्लंघनासाठी श्री तुळजाभवानी मंदिरा कडे प्रस्थान व रात्री १२ वाजता मिरवणूक प्रारंभ, अशी माहिती कुणाल भगत यांनी दिली.


साई द्वारका सेवा ट्रस्ट, साईदास परिवार आणि ॲड. धनंजय जाधव मित्र मंडळाच्या वतीने संगीतमय श्री साई चरित्र कथेच्या चौथ्या दिवसाची महाआरती जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व तिरुपती देवस्थानचे ट्रस्टी सौरभ बोरा यांच्या हस्ते झाली. (छाया – लहू दळवी)

# ‘सबका मालिक एक’ सार्वभौम संदेश देणारे श्री संत साईबाबा हे मानवतेचे खरे दिशादर्शक

### जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे

नगर – सबका मालिक एक हा सार्वभौम संदेश देणारे श्री संत साईबाबा हे मानवतेचे खरे दिशादर्शक आहेत. त्यांच्या विचारांतून श्रद्धा, सबुरी, सेवा आणि करुणेचा संदेश मिळतो. साईबाबांच्या आशीर्वादाने भक्तांच्या जीवनात सकारात्मक ऊर्जा, बळ आणि आत्मविश्वास निर्माण होतो. भारतीय संस्कृती महान असून तिचे जागरण करणे अत्यावश्यक आहे. श्री साईबाबांचा जीवनपट संगीतमय श्री साई चरित्र कथेमधून समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य धनंजय जाधव यांनी केले असून, या कथेमुळे समाज मंत्रमुग्ध झाला आहे. नागरिकांनी श्री साईबाबांचे विचार अंगीकारून आपल्या जीवनात सकारात्मकता आणावी, अशा शब्दांत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी प्रतिपादन केले.

साई द्वारका सेवा ट्रस्ट, साईदास परिवार आणि ॲड. धनंजय जाधव मित्र मंडळाच्या वतीने संगीतमय श्री साई चरित्र कथेच्या चौथ्या दिवसाची महाआरती जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व तिरुपती देवस्थानचे ट्रस्टी सौरभ बोरा यांच्या हस्ते झाली.

ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी चौथ्या दिवसाच्या प्रवचनात सांगितले की, श्री साईबाबांनी आपल्या जीवनकाळात अनेक आजारी रुग्णांना बरे केले तसेच दुःखी आणि संकटग्रस्त भक्तांना धीर देण्याचे काम केले. त्यांनी भक्तांची श्रद्धा तपासण्यासाठी भिक्षा मागताना दोन रुपये मागून श्रद्धा आणि सबुरी या मूलमंत्राचा संदेश दिला. तसेच एक प्रसंग सांगताना महाराज म्हणाले की, साईबाबांनी तीन दिवस आपले शरीर तात्या पाटील कोते यांच्या मांडीवर ठेवून सोडले होते आणि ब्रह्मांड फेरी करून परत आले होते. त्यांच्या जीवनातील हे अलौकिक अनुभव भाविकांना भावनिक करून गेले.

# अळकुटीत हरीबाबा उत्सव भक्तिमय वातावरणात

## अण्णाभाऊ साठे जयंती मासनिमित्त विविध उपक्रमांचा समावेश

नगर – अळकुटी (ता. पारनेर) येथे श्री हरीबाबांचा उत्सव भक्तीमय वातावरणात झाला. यानिमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याचबरोबर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती मास निमित्त समाजजागृतीसाठी विविध उपक्रम पार पडले.


अळकुटी (ता. पारनेर) येथे श्री हरीबाबांचा उत्सवामध्ये महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार प्राप्त सुनिल सकट व राजेंद्र आल्हाट यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार प्राप्त सुनिल सकट व राजेंद्र आल्हाट यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रारंभी सुनील सकट व सौ. वंदना सकट यांनी सपत्नीक हरीबाबांची विधिवत पूजा–अभिषेक करून उत्सवाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान सर्व महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी भारुड, शाहिरी, समाज प्रबोधनात्मक गीतांचे कार्यक्रम रंगले होते. साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे समाज प्रबोधिनी कलामंच प्रस्तुत अण्णाभाऊ साठे गौरव गीत सादर करण्यात आले. सकट यांनी तंटामुक्तीचे अध्यक्ष बाबाजी भंडारी यांना अण्णाभाऊ साठे यांची फकीरा कांदबरी भेट देऊन सत्कार केला.

कार्यक्रमाचे संयोजक शशिकांत (आण्णा) कर्नीगध्वज प्रास्ताविकात म्हणाले की, हा उत्सव फक्त धार्मिक न ठेवता त्याला सामाजिक कार्याची जोड देण्यात आली आहे. महापुरुषांच्या जयंतीसोहळ्याच्या माध्यमातून समाजाला दिशा देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी सरपंच डॉ. कोमलताई भंडारी, माजी उपसरपंच अरिफभाई पटेल, बाळासाहेब पुंडे, अळकुटी ग्रामीण पतसंस्थेचे चेअरमन महेश शिरोळे, अतुल माने, भिमाजी कर्नीगध्वज, श्रीकांत कर्नीगध्वज, मोहन साळवे, हरिभाऊ कर्नीगध्वज, बाळू कर्नीगध्वज, संभाजी साळवे, गोरक्ष कर्नीगध्वज, मनोहर कर्नीगध्वज, घनश्याम कर्नीगध्वज, सोमनाथ कर्नीगध्वज, संतोष शिंदे, पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर, उत्तमराव गायकवाड, प्रिया. गायकवाड, मंगल साळवे, वैशाली आढाव, नवनाथ शिरोळे, संतोष कर्निगध्वज उपस्थित होते.

बाबाजी भंडारी म्हणाले की, अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते तर ते समाजाचे प्रबोधक होते. त्यांनी फकीरा सारख्या कादंबरीतून वंचित, शोषित, व भटक्या समाजाचा आवाज बुलंद केला. त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे समाजाला पुन्हा क्रांतीचा मार्ग दाखवणे सारखे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सरपंच डॉ. कोमलताई भंडारी यांनी हरीबाबा उत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून, तो सामाजिक एकतेचा दुवा आहे. गावातील सर्व समाजघटकांनी उत्सवात सहभाग घेतल्याने खऱ्या अर्थाने संपूर्ण गाव एक कुटुंब ही संकल्पना इथे साकार झाली आहे. समाजातील तरुणांनी शिक्षण, उद्योग आणि सामाजिक कार्य यामध्ये पुढाकार घ्यावा, हीच खरी अण्णाभाऊंना वंदन ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी राम कर्नीगध्वज, संतोष कर्नीगध्वज, अक्षय कर्नीगध्वज, अक्षय साठे, दादाभाऊ कर्नीगध्वज, निलेश साळवे आदींसह दादाभाऊ कर्नीगध्वज परिवाराने परिश्रम घेतले.

# आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना जनजागृतीसाठी समाजकार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा

## डॉ. प्रियंका मडके यांचे प्रतिपादन; सीएसआरडीमध्ये कार्यशाळा

नगर – समाजकार्यकर्त्यांनी आरोग्य योजनांच्या जनजागृतीत पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. प्रियंका मडके यांनी केले. त्यांनी सांगितले की, आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना ही देशातील गरीब व वंचित कुटुंबांसाठी आरोग्य सुरक्षा देणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समाजकार्यकर्त्यांची भूमिका केवळ सहाय्यक नसून जनजागृती व मार्गदर्शन करणारी आहे. प्रत्येक कुटुंबापर्यंत योजनांची माहिती पोहोचली पाहिजे आणि त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला पाहिजे, यासाठी समाजकार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा.


नॅशनल असोसिएशन ऑफ प्रोफेशनल सोशल वर्कर्स इन इंडिया यांच्या पुढाकाराने आयोजित सहाव्या राष्ट्रीय समाजकार्य सप्ताह २०२५ निमित्त बीपीएचई सोसायटीच्या सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्थेमध्ये आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना जनजागृती अभियानाबाबत माहिती देताना डॉ. प्रियंका मडके.

नॅशनल असोसिएशन ऑफ प्रोफेशनल सोशल वर्कर्स इन इंडिया यांच्या पुढाकाराने आयोजित सहाव्या राष्ट्रीय समाजकार्य सप्ताह २०२५ निमित्त बीपीएचई सोसायटीच्या सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, अहिल्यानगर येथे आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना जनजागृती अभियान राबविण्यात आले. यावर्षीच्या राष्ट्रीय समाजकार्य सप्ताहाची थीम आरोग्य क्षेत्रातील समाजकार्य – सेवा आणि सहानुभूती यांचा सेतू अशी असून त्याअंतर्गत आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना याबाबत माहिती देणारी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या जिल्हा प्रमुख डॉ. प्रियंका मडके, सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, योजनेचे दक्षता अधिकारी विठ्ठल वांडेकर, पर्यवेक्षक हर्षल साळवे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिकेत भालसिंग, डॉ. सपना परदेशी, वरिष्ठ जिल्हा समन्वयक रोहित कारंडे, डॉ. स्वप्नील तुपे, आरोग्य मित्र तुषार वाघमारे, विजय राहिंज, गीतांजली मोडक, तसेच बूथ हॉस्पिटलचे अमित पठारे आदी उपस्थित होते.

यानंतर विठ्ठल वांडेकर यांनी योजनेतील तरतुदी, पात्रता निकष व आवश्यक कागदपत्रे याबाबत सविस्तर माहिती दिली.

हर्षल साळवे व रोहित कारंडे यांनी ऑनलाईन प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांना आरोग्य कार्ड तयार करण्याची प्रक्रिया दाखवून दिली. या वेळी विद्यार्थ्यांचे आरोग्य कार्ड प्रत्यक्षात तयार करून देण्यात आले. आरोग्य मित्रांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी ही प्रक्रिया अनुभवली.

प्रास्ताविक करताना डॉ. सुरेश पठारे यांनी सांगितले की, समाजकार्य अभ्यासक्रमामध्ये क्षेत्रकार्य हा घटक अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्याअंतर्गत विद्यार्थी ग्रामीण भाग तसेच शहरी वस्त्यांमध्ये जाऊन प्रत्यक्ष अनुभव घेतात. राष्ट्रीय समाजकार्य सप्ताहानिमित्त संस्थेत विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आयुष्यमान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजना याबाबत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व प्रात्यक्षिक दिले जात आहे. येत्या काळात विद्यार्थ्यांनी आपल्या क्षेत्रकार्याच्या माध्यमातून या योजना अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवाव्यात. असे आवाहन केले. तसेच, संस्थेच्या माध्यमातून समाजात आरोग्यविषयक जनजागृती घडवून आणणे, योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे आणि नागरिकांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे हा आमचा उद्देश आहे, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना योजनांची सखोल माहिती तर मिळालीच, पण प्रत्यक्ष आरोग्य कार्ड तयार करण्याची प्रक्रिया अनुभवण्याची संधीही मिळाली. पुढील काळात हे विद्यार्थी क्षेत्रकार्य व समाजजनजागृती मोहिमेद्वारे ग्रामीण व शहरी भागातील अधिकाधिक नागरिकांपर्यंत ही योजना पोहोचवतील, असा विश्वास डॉ. विजय संसारे यांनी कार्यशाळेच्या समारोपावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सॅम्युअल वाघमारे यांनी केले. डॉ. सुरेश मुगुटमल यांनी आभार मानले. सीएसआरडीचे प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.


मानसीज् डान्स स्टुडिओच्या वतीने मंगळागौर शिबिरामध्ये जयंत येलुलकर, सुरेखा डावरे, राजेंद्र टाक, डॉ. दमन काशीद आदी.

# कलाकारांच्या गुणवत्तेला वाव दिल्यास ते शहराचे नाव समृद्ध करतील

## रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलुलकर यांचे प्रतिपादन; महिलांनी लुटला मंगळागौर गाणी, नृत्य आणि खेळाचा आनंद

नगर – सांस्कृतिक क्षेत्रात अहिल्यानगर शहराचे नाव महाराष्ट्राच्या नकाशावर अग्रेसर पणाने घेतले जात असून असून नृत्य, कला, संगीत कलाकारांच्या योगदानामुळे झालेली आपल्या शहराची ओळख नगरकरांना अभिमानास्पद असून या गुणी कलाकारांना पुणे, मुंबई सारख्या महानगरात याआपल्या कलेची चुणूक दाखविण्याची संधी मिळाली तर त्यांच्यातील कलागुणांना दिशा मिळेल व त्यांचे भविष्य उज्वल होईल असे प्रतिपादन रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलुलकर यांनी केले. भविष्यात ग्रुपच्या माध्यमातून यासाठी निश्चितपणे प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मानसीज् डान्स स्टुडिओच्या वतीने श्रावण महिन्याचे औचित्य साधून नुकतेच मंगळागौर शिबिराचे नुकतेच आयोजन केले गेले. उत्साहात या शिबिराची सांगता पारंपारिक मंगळागौर नृत्य गाणी व खेळ या सादरीकरणाने झाली. या प्रसंगी येलुलकर बोलत होते. अंजली नृत्यालयाच्या सुरेखा डावरे, स्वरबहार फाउंडेशनचे राजेंद्र टाक, डॉ. दमन काशीद, इंजि. किरण साळवे, इंजि. निलेश महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्रीमती सुरेखा डावरे, राजेंद्र टाक यांची भाषणे झाली.

गुलमोहर रोड वरील आम्रपाली मंगल कार्यालय येथे मंगळागौर महिला उत्सव शिबिरात प्रशिक्षित महिलांनी भाग घेताना गौरबाई मंगळागौर, फुगड्या, वाकड झिम्मा, लाडू झिम्मा, सूप, लाटणे, कळशा, खुंटन – मिरची आठोड– गाठोड, आगोटा– पागोटा, नृत्य, खेळाचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकून घेतली. प्रमुख पाहुणे आणि प्रमुख प्रायोजक सुविधा मार्केटचे संतोष शिंदे, मी राजहंसच्या संचालिका तेजस्विनी आहेर, परिहार वेसनमुक्ती पुनर्वसन आणि मानसिक आरोग्य केंद्राचे मधुकर काळे, ३२ स्माईल दातांचा दवाखान्याचे डॉ. योगेश सोनवणे, डॉ. गीतांजली सोनवणे, माहेर हॉस्पिटल व मॅटरनिटी होमचे डॉ. सोनाली गुंजाळ, नाथकृपा ट्रेडर्सचे प्रदीप सोलाट यांचा सन्मान डॉ. अशोक गायकवाड कान, नाक, घसा तज्ञ व डॉ. शैलेंद्र खंडागळे यांच्या हस्ते करण्यात आला. निवेदिका डॉ. प्राजक्ता सावेडकर, गायक निवेदक साई स्वरांजली आर्केस्ट्राचे नरेश बडेकर यांना यावेळी गौरविण्यात आले. यावेळी काढण्यात आलेल्या लकी ड्रॉ चे पहिल्या बक्षीसाच्या मानकरी श्रुती कुऱ्हाडे यांना पैठणी तसेच गोवा हॉलिडे ३ रात्र व ४ दिवस. भाग्यश्री लकी ड्रॉ विजेत्या भार्गवी सोनवणे यांना मिळाले कंपनीच्या व्यवस्थापिका ईशान्या भिंगारदिवे यांनी हॉलिडे पॅकेज दिले. मानसी डान्स स्टुडिओच्या मानसी देठे यांनी आभार मानले. यावेळी संस्थेची संचालिका व नृत्य दिग्दर्शिका मानसी देठे यांच्या योगदानाबद्दल त्यांचा सर्वांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रतिभा देठे, सिमा देशमुख, अर्चना शिंदे, कल्पना कांबळे, डॉ. संगीता खंडागळे, विक्रम देशमुख, संतोष शिंदे, विनोद शिरसाठ यांनी परिश्रम घेतले.

# राजेंद्र सोनवणे यांना शिक्षकरत्न पुरस्कार जाहीर



नगर – जनआरोग्यम परिवार, जाणीव फाउंडेशन यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार शालेय शिक्षक राजेंद्र अरुण सोनवणे यांना जाहीर करण्यात आला आहे. ३१ ऑगस्ट रोजी संगमनेर येथे होणाऱ्या लोकनेते बाळासाहेब थोरात गुणगौरव पुरस्कार २०२५ सोहळ्यात सोनवणे यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

राजेंद्र सोनवणे शनिश्वर प्राथमिक विद्यालयाचे उपशिक्षक असून, स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे नेवासा तालुकाध्यक्ष आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकास व गुणवत्ता वाढीसाठी ते विशेष उपक्रम राबवून गुणवंत विद्यार्थी घडवत आहे. शिक्षणाबरोबरच कला, क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचे काम करत आहे. तसेच रायझिंग ट्रायबल फाउंडेशनचे संचालक व जगदंब प्रतिष्ठान (घोडेगाव) चे सचिव म्हणून काम पाहत असताना ते सामाजिक योगदान देखील देत आहेत. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा रायझिंग ट्रायबल फाउंडेशनचे संस्थापक प्रसाद शिंदे यांनी सोनवणे यांचे अभिनंदन करुन, संघटनेमध्ये शिक्षकांच्या विविध प्रश्नावर त्यांनी वेळोवेळी आवाज उठवून शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. तसेच रायझिंग फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी योगदान दिले आहे. हा पुरस्कार त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याला आणखी बळकटी देणारा ठरणार असल्याचे स्पष्ट केले.



## नागापूर येथील संत चक्रधर स्वामी विद्यालयात जयंती साजरी

संत चक्रधर स्वामी यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना विद्यालयाच्या प्राचार्य श्रीमती मनीषा कासार, विद्यालयाचे शिक्षक वृंद श्रीमती पालवे, कोकाटे, झावरे, शिरसाठ, काकडे, फुंदे, इथापे, सातपुते, सप्रे, घोरपडे, श्री.सोनवणे, पवार, शिरोळे, आगलाव आदीसह शिक्षक वृंद उपस्थित होते.

# महापालिकेची निवडणूक जिंकण्याचा संकल्प करत भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे

**अनिल मोहिते यांचे आवाहन**



रविश कॉलनीमध्ये आयोजित बैठकीत भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते व दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांचा सत्कार करताना शहर चिटणीस मिलिंद भालसिंग व वकील आघाडीचे अध्यक्ष अ‍ॅड.चंदन बारटक्के.

नगर – भारतीय जनता पार्टी महापालिकेच्या निवडणुकीसाठी कटीबद्ध झाली आहे. ही निवडणूक जिंकण्याच्या संकल्प करत पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे. सर्व समावेशक जुन्या नव्या पदाधिकाऱ्यांची सांगड घालत शहराची नवी कार्यकारणी जाहीर केली आहे. त्यामुळे शहरात पक्षाची ताकद अधिक वाढणार आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्याला न्याय देणारा भाजप पक्ष असल्याने प्रत्येकला योग्य पद मिळतेच, असे प्रतिपादन अहिल्यानगर भाजपचे शहर जिल्हध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.

कायनेटिक चौकातील रविश कॉलनीत आयोजित बैठकीत अनिल मोहिते व दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी मार्गदर्शन केले. यावेळी नवनियुक्त चिटणीस मिलिंद भालसिंग व वकील आघाडीचे अध्यक्ष अ‍ॅड.चंदन बारटक्के यांनी मोहिते व भालसिंग यांचा सत्कार केला.

या बैठकीस युवा मोर्चाचे अध्यक्ष अ‍ॅड.रुद्रेश आंबाडे, बंटी डापसे व कुणाल भंडारी आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. कॉलनीतील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात गणेशाची आरती मोहिते व भालसिंग यांच्या हस्ते करण्यात आली.

दिलीप भालसिंग म्हणाले, भारतीय जनता पक्ष आज देशातील सर्वात मोठा पक्ष आहे. आदर्शवत काम करणाऱ्या या पक्षाचे पदाधिकारी झाल्याने आपापल्या नागरिकांना सहकार्य करून त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करा. या भागात मिलिंद भालसिंग व अ‍ॅड.चंदन बारटक्के यांचे उत्कृष्ट काम आहे.

या कार्यक्रमास कुंडलीक गदादे, लिपाने नाना, प्रा.राम शिंदे, राहुल तांबे, विशाल शिवचरण, अंजिक्य खांदवे, अ‍ॅड.निखिल मुसळे, अजित भालसिंग, महेश देशपांडे, सदानंद गुरव, राहुल काळे, विशाल जोशी, प्रथमेश औटी, वेद पवार, संतोष गायकवाड, अशोक ठुबे आदी उपस्थित होते.

# ‘इन्स्पायरिंग एज्युकेशन अ‍ॅवॉर्ड २०२५’ डॉ. आर. जे. बार्नबस यांना प्रदान




डॉ. आर. जे. बार्नबस यांना प्रदान करण्यात आलेला ‘इन्स्पायरिंग एज्युकेशन अवॉर्ड २०२५’ पुरस्कार स्विकारता प्रा. दिलीपकुमार भालसिंग, डॉ. सय्यद रझाक, ग्रंथपाल डॉ. प्रशांत फुगनार.

नगर – स्टडीनलर्न आणि ए.एन.जी. इंडिया या संस्थांच्या वतीने इन्स्पायरिंग एज्युकेशन अवॉर्ड २०२५ ने चेअरमन प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांना गौरविण्यात आले. मुंबईत भरलेल्या सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार समारंभाला शिक्षणतज्ज्ञ, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. बार्नबस यांच्या वतीने हा पुरस्कार प्रा. दिलीपकुमार भालसिंग, डॉ. सय्यद रझाक आणि ग्रंथपाल डॉ. प्रशांत फुगनार यांनी स्वीकारला. त्यांनी सांगितले की, हा सन्मान केवळ व्यक्तिशः डॉ. बार्नबस यांचा नसून, संपूर्ण संस्थेचा आणि शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे. त्यांचे नेतृत्व, दूरदृष्टी आणि समर्पण भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

ए.एन.जी. इंडिया ही तंत्रज्ञानाला प्राधान्य देणारी संस्था आहे. भारतातील के–१२ विद्यार्थी व शिक्षकांसाठी परस्परसंवादी शैक्षणिक उपाय उपलब्ध करून देणारे व्यासपीठ स्टडीनलर्न कडून आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या साहाय्याने शिकवणीस प्रोत्साहन दिले जाते. स्टडीनलर्न हे भारतीय अभ्यासक्रम आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना व शिक्षकांना समर्थन देण्यासाठी कार्यरत आहे.

अ‍ॅनिमेटेड व्हिडिओ, गेमिफिकेशन, एआय–संचालित साधने, इंटरएक्टिव्ह फ्लॅट पॅनेल, स्मार्ट क्लास कंटेंट आणि लर्निंग अ‍ॅप्स यांसारख्या आकर्षक व नाविन्यपूर्ण शैक्षणिक सुविधा संस्थेकडून उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे कोणत्याही विषयाचा अभ्यास विद्यार्थ्यांना सोप्या व परिणामकारक पद्धतीने करता येतो. याच तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून अहमदनगर महाविद्यालय विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना मागणीनुसार सुविधा पुरवत आहे. त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी भविष्यातील कोणत्याही शाखेत स्पर्धेत सर्वात अग्रेसर राहतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



नगरच्या बाबुशेठ बोरा यांचा सिकंदराबादमध्ये सन्मान करण्यात आला.

# नगरच्या बाबुशेठ बोरा यांचा सिकंदराबादमध्ये सन्मान

नगर – येथील अशोक (बाबुशेठ) बोरा यांचा सन्मान सिकंदराबादमध्ये करण्यात आला. राष्ट्रसंत श्री ललितप्रभाजी, श्री चंद्रप्रभाजी व मुनीश्री शांतीप्रियजी यांच्या सान्निध्यात होत असलेल्या चातुर्मासमध्ये जीने की कला या विशेष प्रवचनमालेत आयोजित धर्मसभेमध्ये अशोक (बाबुशेठ) बोरा यांचा चातुर्मास समितीतर्फे अध्यक्ष मोतीलाल भळगट यांच्या हस्ते हार व शाल देऊन सन्मान करण्यात आला.

जैन धर्मकार्य करताना साधु–साध्वींची सेवा आचार्य श्रीआनंदऋषीजींच्या कृपाशिर्वादाने घडते आहे. साधु–साध्वींच्या सेवेतील आनंद मोठा असतो. राष्ट्रसंत श्री ललितप्रभाजी आणि श्री चंद्रप्रभाजी यांच्या प्रेरणादायी प्रवचनांमधून समाजाला प्रेरणा मिळते आहे. अहिल्यानगरमध्ये आगामी चातुर्मास उपाध्याय प्रविणऋषिजी म.सा.यांचाच होणार असून त्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे. सिकंदराबादमधील श्रावक–श्राविकांनी मोठ्या संख्येने या चातुर्मासाचा लाभ घेण्यासाठी यावे, असे निमंत्रणही सर्वांना देतो आहे, असे सत्कारास उत्तर देताना अशोक बोरा यांनी सांगितले.

या प्रसंगी अमित मुनोत, प्रदीप सुराणा, उमेश बागरेचा, अशोक नहार तसेच चातुर्मास समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# योगाच्या प्रसार, प्रचारात ‘योगविद्याधाम’चा मोलाचा वाटा

**स्नेहालयचे प्रा.डॉ. गिरीष कुलकर्णी यांचे प्रतिपादन; ४० व्या वर्धापनदिनानिमित्त शिक्षकांचा मेळावा**



योग विद्या धामच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त योग शिक्षकांच्या मेळाव्याचे उदघाटन स्नेहालयचे प्रा.डॉ. गिरीष कुलकर्णी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. दत्ता दिकोंडा, सुभाष पांढरे, विलास नडीमेटला, दिलीप कुलकर्णी, सौ अंजली कुलकर्णी, जयंत वेसीकर, माणिक अडाणे, राजनकुमार, दिलीप देशपांडे, सौ. मीना देशपांडे आदी (छाया – उदय जोशी)

नगर – रोजच्या ताणतणावाने भरलेल्या आयुष्यामध्ये मानसिक स्वास्थ, शारीरीक उर्जा, बळ योगसाधनेमुळे मिळते, स्वत:शी नात घट्ट होते. योगसाधनेतून जीवनाकडे पाहण्याचा नवीन दृष्टीकोन मिळतो. ती फक्त शारीरीक क्रिया नसते तर ती मनावर खूप जास्त परीणाम करते. औषधापेक्षाही जास्त काम सकाळचा व्यायाम त्यातही प्रामुख्याने योगसाधना असते. शरीरापेक्षा मनावर योगाचा परीणाम जास्त होतो. उन, पाउस, वारा यांचा विचार न करता योगविद्याधामचा अविरत ४० वर्षे योग शिकविण्याचा प्रवास अखंड सुरू आहे. नगर शहरात व जिल्ह्यात योगाचा प्रसार, प्रचारात योगविद्याधाम संस्थेचा मोलाचा वाटा आहे, असे प्रतिपादन स्नेहालयचे प्रा.डॉ. गिरीष कुलकर्णी यांनी केले.

योग विद्या धामच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त योग शिक्षकांच्या मेळाव्याचे उदघाटन स्नेहालयचे प्रा.डॉ. गिरीष कुलकर्णी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. दत्ता दिकोंडा, सुभाष पांढरे, विलास नडीमेटला, दिलीप कुलकर्णी, सौ अंजली कुलकर्णी, जयंत वेसीकर, माणिक अडाणे, राजनकुमार, दिलीप देशपांडे, सौ. मीना देशपांडे आदी उपस्थित होते.

गिरीश कुलकर्णी पुढे म्हणाले, योगविद्याधाममध्ये परीपूर्ण असा शिक्षक तयार केला जातो. शास्त्रशुद्ध माध्यमातून योगविद्या शिकवली जाते. योगाचा प्रचार प्रसार केला जातो. योगविद्याधामच्या माध्यमातून उच्चतम दर्जाची योगसाधना व प्रचार करणारा साधक तयार होत आहे.

दत्ता दिकोंडा व सुभाष पांढरे यांनी योगविद्याधामच्या ४० वर्षे वाटचालीबाबत माहीती दिली. रूपेश झंवर यांनी भविष्यातील वाटचालीबाबत माहीती दिली. सुत्रसंचालन सौ. मनियार यांनी केले.

योग गीत संगीता मिस्त्री यांनी सादर केले. पाहुण्याचा परीचय दत्ता दिकोंडा यांनी करून दिला. गणेश यनगंदुल यांनी आभार मानले. विशेष कार्य केलेल्या शिक्षक व संस्थापक सदस्याचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी मनोरंजनात्मक कार्यक्रमाचेही आयोजन केले होते. योग शिक्षक उपस्थित होते.

# ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या ग्रंथामुळे भारतीय संस्कृती व वाडमायाकडे विश्वाचे लक्ष वेधले गेले

**दत्तात्रय वारकड यांचे प्रतिपादन**



नेवासा – ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या महान व पवित्र ग्रंथामुळे भारतीय संस्कृती व वाडमयाकडे अखिल विश्वाचे लक्ष वेधले गेले, असे प्रतिपादन पावन नेवासा नगरी येथे लेखक व प्रेरणादायी वक्ता दत्तात्रय वारकड यांनी केले.

महाराष्ट्र ही संतांची आणि महापुरुषांची पावन भूमी आहे. संत ज्ञानेश्वर माऊली, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव, संत मुक्ताई, संत तुकाराम, संत नामदेव, संत चोखामेळा, संत सावता महाराज अशा असंख्य संतांनी समाजप्रबोधनासाठी आपले जीवन अर्पण केले. त्यांनी केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला आणि जगाला वैभव प्राप्त करून दिले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिकारक सावित्रीबाई फुले, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी थोर व्यक्तींनी आपल्या पराक्रमाने इतिहासात अमिट ठसा उमटवला.

तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वर माऊलींनी वारकरी संप्रदायाची पायाभरणी करून भागवत धर्माचा संदेश दिला. त्यांनी ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव सारखे अनुपम ग्रंथ रचून समाजाला आध्यात्मिक व नैतिक जीवनमार्ग दाखवला. नेवासा नगरीतील पैस खांब येथे ज्ञानेश्वरीची निर्मिती झाल्याचा ऐतिहासिक सन्मान नेवासकरांना लाभला आहे.

याच भूमीत ज्ञानोदय इंग्लिश मीडियम स्कूल व स्व. सुंदराबाई गांधी कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संत ज्ञानेश्वर माऊलींची ज्ञानज्योत – अखिल मानवजातीसाठी अखंड प्रेरणास्त्रोत या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दत्तात्रय वारकड यांनी संत ज्ञानेश्वर माऊलींचे समाजपुनरुत्थानातील कार्य, भागवत धर्माची मांडणी व वारकरी संप्रदायाचे महत्त्व यावर सखोल भाष्य केले.

कार्यक्रमाला ज्ञानदेव इंग्लिश स्कूलचे प्राचार्य चौधरी सर, पर्यवेक्षिका दिघे मॅडम, सुंदराबाई गांधी कन्या विद्यालयाच्या प्राचार्या पारखे मॅडम, बनकर सर, आखाडे सर, धस सर व ढेरे सर उपस्थित होते. सर्वांनी व्याख्यानाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना संत साहित्याचा अभ्यास करण्याचे आवाहन केले.

भगवद्गीतेतील गहन तत्त्वज्ञानाचे साध्या मराठीत भावांतर करून संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीची निर्मिती केली. या ग्रंथातील गोड, प्रेरणादायी व ज्ञानमूल्यांनी परिपूर्ण ओव्यांमुळे समाजाचे मार्गदर्शन आजही होते आहे. पसायदान या नऊ ओव्यांमधून त्यांनी विश्वकल्याणाची प्रार्थना करून मानवतेच्या ऐक्याचा संदेश दिला.

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या शिकवणुकीतून प्रकट झालेली समता, बंधुता, स्वातंत्र्य आणि मानवधर्माची तत्त्वे आजही समाजाला मार्गदर्शक ठरत आहेत आणि भावी पिढ्यांनाही दिशा दाखवतील.



भोयरे पठार येथील भाग्योदय विद्यालयाच्या कबड्डी संघासोबत मुख्याध्यापक हबीब शेख आदी.

# भोयरे पठार येथील भाग्योदय विद्यालयाचा कबड्डी संघ विजेता

नगर – नगर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये भोयरे पठार (ता. नगर) येथील भाग्योदय विद्यालयाच्या १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या कबड्डी संघाने विजेतेपद पटकाविले. या स्पर्धेत नगर तालुक्यातील विविध शाळांच्या ४० सघांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये भाग्योदय विद्यालयाच्या मुलांच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. ही स्पर्धा भातोडी (ता. नगर) येथील राजमाता शिक्षण संस्था भातोडी संचलित नृसिंह विद्यालयात पार पडली. यावेळी क्रीडा समितीचे अध्यक्ष महेंद्र हिंगे, संस्थेचे पदाधिकारी व विद्यालयाचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

मुख्याध्यापक हबीब शेख यांनी मुलांच्या कबड्डी संघाने विजेतेपद पटकावून भोयरे पठार गावचे नाव उंचावले आहे. ही विद्यालयाच्या आणि गावच्या दृष्टीने अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संघातील खेळाडूंचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

शाळेच्या कबड्डी संघाने मिळवलेल्या यशाबद्दल भैरवनाथ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष भानुदास कोतकर, संस्थेचे सचिव सचिन (आबा) कोतकर, संचालिका वैशालीताई कोतकर, रघुनाथ लोंढे, विद्यालयाचे मुख्याध्यापक हबीब शेख, क्रीडा शिक्षक भरत लगड, शालेय शिक्षक संजय गोसावी, सतीश मुसळे, शिवाजी धस, रामदास साबळे, सुनीता दिघे, अशोक टकले, मनीषा वाठोळे, संदीप भवर, अरुण उरमुडे आदींसह ग्रामस्थांनी विजेत्या खेळाडूंचे व क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले.



बिग बॉस सिझन १८ फेम अभिनेत्री यामिनी मल्होत्रा यांची मुंबई येथे जगभरात १४३ देशात ध्यानधारणा शिकवणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने बी के तपस्विनी दीदी व ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ. दीपक हरके यांनी भेट घेऊन त्यांना संस्थेच्या कार्याची माहिती देऊन ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली व संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय असलेल्या माऊंट अबू ला भेटीचे निमंत्रण दिले. यावेळी बी के बिकास बारीक व बी के विकास अगरवाल उपस्थित होते.

# प्रा.अनिरुध्द शिर्के यांना पी.एच.डी. पदवी प्रदान



नगर – विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. अनिरुध्द हरिश्चंद्र शिर्के यांना नुकतीच इंदोर येथील ओरीएंटल विद्यापीठाची सस्टेनेबल डेव्हलपमेंट ऑफ टर्नरी ब्लेन्डेड कॉन्कीट युजींग नॅनो मटेरिअल्स या विषयावर सिव्हील इंजिनीअरींग या क्षेत्रातील विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. सदर अभ्यासक्रमात त्यांना इंदोर येथील ओरिएंटल विद्यापीठाचे सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे डॉ. मनीष पाटकर यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ.अनिरुध्द शिर्के यांच्या या विषयावरील रिसर्चचा अभ्यास करत असताना त्यांनी इंटरनॅशनल स्कोपस या जर्नल्समध्ये ३ पेपर प्रेझेंटेशन केले. तसेच नॅशनल व इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये त्यांचे वरील विषयावरील एकुण ०१ पेपर्सचे पब्लीकेशन झालेले आहे.

# सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विविध स्पर्धा उत्साहात

**जयघोष स्वातंत्र्यदिनाचा उत्सव हा राष्ट्रभक्तीचा**



स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सेंट विवेकानंद स्कूलमध्ये मुख्याध्यापिका सौ.कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सेंट विवेकानंद स्कूलमध्ये मुख्याध्यापिका सौ.कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. पूर्व प्राथमिक विभागामध्ये रक्षाबंधन उत्सव, कृष्ण जन्माष्टमी तसेच चित्रकला स्पर्धा, नॅशनल लिडरस् डे या स्पर्धांचे सौ.कनन शिरवानी, सौ. गुंजन पंजवाणी, सौ. दिपा आहुजा, सौ.अमृता करामुंगे, जुही परयानी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आल्या होत्या.

इयत्ता पहिली व दुसरीसाठी सौ. नम्रता कुकरेजा, सौ. पूजा चोपडा, करिष्मा शेख, सौ. प्रीती कटारिया आणि सौ.मेधा कुलकर्णी या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली देशभक्तीपर गीतांवर नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये उस्फूर्त सहभाग नोंदवत विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्य कौशल्याच्या आधारे वेगळाच ठसा उमटविला.

इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या कल्पनाशक्तीला आणि भाषिक रचनात्मकतेला वाव मिळवण्याच्या दृष्टिकोनातून, सौ.चांदणी सोनग्रा व अमरिंदर कौर यांच्या मार्गदर्शनाखाली ‘जय हिंद – अ पॅट्रीओटीक ट्रीब्युट’ स्पर्धा घेण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी सुंदर रचना आपल्या गोड आवाजात सादर केल्या.

इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी पोस्टर मेकिंग स्पर्धा ठेवण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी आपल्या सृजनशीलतेतून अतिशय उत्कृष्ट असे चित्र रेखाटले. या स्पर्धेसाठी सौ.अश्विनी देशपांडे, सौ. अनामिका म्हस्के, सौ.प्रियांका चारगुंडी यांनी मार्गदर्शन केले.

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून उत्कृष्ट अशा रचना साकारल्या. सहभागी विद्यार्थ्यांना सौ. करिष्मा नवलानी, सौ. भावना ढाळे व शुभांगी पाखरे यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच आपल्या देशाच्या जाज्वल्य इतिहासाची विद्यार्थ्यांना माहिती हवी. त्यांची अभ्यासवृत्ती वाढावी यासाठी स्वातंत्र्य लढ्या विषयी एक प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा खालील ग्रुप मध्ये घेण्यात आली.

रोझ ग्रुप – पूजा चोपडा, पॅनसिस – अमरिंदर कौर, सनफ्लॉवर –चांदणी सोनग्रा, ब्ल्यू बेल्स – प्रीती कटारिया या स्पर्धेत ब्ल्यू बेल्स प्रीती कटारिया यांचा संघ विजेता ठरला.

नृत्य स्पर्धेसाठी सौ. गौरी सुद्रिक व सौ. समिना शेख, रांगोळी स्पर्धेसाठी सीमा कोटस्थाने व सौ. दिपा आहुजा, पोस्टर बनवा स्पर्धेसाठी सौ. रुचिता सारडा व सौ. कनन सिरवानी, कविता स्पर्धेसाठी सौ. तसनीम हकीमजीवाला व सौ गुंजन पंजवानी, क्विज स्पर्धेसाठी सौ. करिष्मा नवलानी व सौ. करिष्मा शेख यांनी क्वीझ मिस्ट्रेस म्हणून काम पाहिले.

त्यानंतर शाळेत बक्षीस वितरण समारंभ करण्यात आला व विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

या सर्व कार्यक्रमाचे क्षणचित्रे व चलचित्र सौ.शुभांगी क्षीरसागर यांनी कॅमेऱ्यामध्ये जतन करण्याचे काम केले. कार्यक्रमाचे रंगत वाढवण्यासाठी बाळासाहेब पठारे यांनी सुमधुर संगीताची साथ दिली.

याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी विद्यार्थ्यांनी देशभक्तीचे मूल्य अशाच उपक्रमातून रुजवले जाते. त्यामुळे विध्यार्थ्यानी अशा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले.

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, श्री. हरेष, शाळेच्या प्राचार्या गीता तांबे यांनी स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# अर्थजगत

## भांडवली लाभाचे त्रांगडे

वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी २०२५ रोजी सादर केलेल्या बजेट भाषणात एक मोठी घोषणा केली की नव्या कर प्रणालीत (छ्यु ढ्र ठ्शसळाश) १२ लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर कोणताही इनकम टॅक्स लागणार नाही. या घोषणेनंतर



संसदेतील वातावरण टाळ्यांच्या गजराने दणाणून गेले. त्यानंतर त्यांनी जाहीर केले की या मर्यादेव्यतिरिक्त करदात्यांना ७५,००० रुपयांचा स्टँडर्ड डिडक्शनचा लाभ मिळेल. त्यामुळे प्रत्यक्षात १२.७५ लाख रुपये पर्यंतचे उत्पन्न पूर्णपणे करमुक्त होणार असल्याचे स्पष्ट झाले.

मात्र यामध्ये एक महत्त्वाची अट आहे. फायनान्स ॲक्टह्र२०२५ नुसार कलम ८७ए अंतर्गत मिळणारी कर सवलत विशेष उत्पन्नांवर (स्पेशल इन्कम) लागू होणार नाही. म्हणजेच शॉर्ट-टर्म कॅपिटल गेन आणि लॉन्ग-टर्म कॅपिटल गेन यासारख्या उत्पन्नांवर कर सवलत मिळणार नाही. याचा सरळ अर्थ असा की तुमचे एकूण वार्षिक उत्पन्न १२.७५ लाख रुपयांच्या आत असले तरी जर त्यात भांडवली नफ्याचे उत्पन्न असेल तर त्यावर स्वतंत्रपणे इनकम टॅक्स द्यावा लागेल.

सध्या अस्तित्वात असलेल्या नियमांनुसारही कलम ८७ए अंतर्गत मिळणारी पूर्ण कर सूट अशा विशेष उत्पन्नांवर लागू होत नाही. म्हणजेच फाइनान्शियल इयर २०२४-२५ (ए.वाय. २०२५ह्र२६) साठी जुन्या कर प्रणालीत ५ लाख आणि नव्या कर प्रणालीत ७ लाख पर्यंतच्या उत्पन्नाला करसवलत मिळते; परंतु ही सूट कॅपिटल गेन टॅक्ससारख्या उत्पन्नांसाठी उपलब्ध नसते. यामुळे करदात्यांसाठी परिस्थिती अशी आहे की ह्र जर तुमचे उत्पन्न वेतन (ड्ढ्रश्ररॲ्रॅ) किंवा व्यवसाय/व्यवसायिक उत्पन्न असेल आणि ते १२.७५ लाखांच्या आत असेल तर कोणताही टॅक्स लागणार नाही.

पण जर या उत्पन्नामध्ये शेअर बाजारातील नफा, म्युच्युअल फंड नफा, किंवा इतर कॅपिटल गेन समाविष्ट असेल तर त्या विशेष उत्पन्नावर सरकारने ठरवलेल्या दराने कर द्यावा लागेल.

यावर तज्ज्ञांचे मत आहे की आयकर विभागाने हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की हा बदल प्रत्यक्षात वित्तीय वर्ष २०२४-२५ पासून लागू आहे की २०२५-२६ पासून. कारण सध्या इनकम टॅक्स रिटर्न सॉफ्टवेअरदेखील कॅपिटल गेन उत्पन्नावर कलम ८७ए ची सूट देत नाहीये. म्हणूनच एकूणच बघता, नवी कर प्रणाली करदात्यांसाठी मोठा दिलासा देणारा ठरला असली तरी, ज्यांचे उत्पन्न विशेषतः कॅपिटल गेनवर अवलंबून आहे त्यांना अजूनही टॅक्सचा भुर्दंड सहन करावा लागणार आहे.

◆◆◆

> बहुसंख्य मोबाईल वापरकर्ते आजकाल दोन सिमकार्डचा वापर करतात. पण, जेव्हापासून रिचार्ज योजना महाग झाल्या तेव्हापासून एकाच वेळी दोन्ही सिमवर रिचार्ज करणे कठीण झाले आहे. अशा वेळी लोक बहुतांश त्या सिमकार्डवरच रिचार्ज करून ते सक्रिय ठेवतात ज्यावरून बोलणे जास्त होते आणि दुसरा नंबर ते अनेक महिने रिचार्ज न करता तसाच ठेवतात. जर आपणही आपला एखादा नंबर अनेक दिवस रिचार्ज न करता ठेवत असाल तर ही चूक आपल्याला मोठ्या अडचणीत आणू शकते.

## दीर्घकाळ रिचार्ज न केल्यास...

कोणत्याही सिमकार्डला एक मर्यादित वैधता असते, तोपर्यंत तो रिचार्जशिवाय सक्रिय राहतो. जर आपण बराच काळ एखादा नंबर रिचार्ज केला नाही तर तो नंबर बंद होऊ शकतो आणि कंपनी तो दुसऱ्या ग्राहकाला देऊ शकते.
त्या नंबरवर येणारे खासगी फोन, वैयक्तिक संदेश दुसऱ्यापर्यंत पोहोचू शकतात आणि आपली गोपनीयता भंग होऊ शकते. अलीकडेच असा प्रकार क्रिकेटपटू रजत पाटीदार यांच्या बाबतीत घडला आहे. त्यांचा नंबर बंद झाल्यानंतर तो दुसऱ्या ग्राहकाला देण्यात आला आणि त्यांना येणारे सर्व फोन कॉल्स दुसऱ्या ग्राहकाकडे जाऊ लागले.

आपण आपला नंबर रिचार्ज न करता बंद ठेवला आणि तो दुसऱ्याला मिळाला, तर आपल्याला वैयक्तिक अडचणींचा सामना करावा लागू शकतोच, पण जर तो व्यक्ती त्या नंबरचा गैरवापर करत असेल तर आपण संकटात सापडू शकता. म्हणूनच आपला मोबाईल नंबर वेळोवेळी रिचार्ज ठेवणे आवश्यक आहे.

**ट्रायचे नियम काय सांगतात?**

भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (ट्रायने) सिमकार्ड सक्रिय ठेवण्यासंबंधी काही नियम घालून दिले आहेत. या संदर्भात ट्रायने सर्व दूरसंचार कंपन्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. जर एखादा ग्राहक बराच काळ आपला नंबर रिचार्ज न करता ठेवतो, तर त्याचा नंबर बंद केला जाऊ शकतो आणि तो दुसऱ्या ग्राहकाला देण्यात येऊ शकतो. जिओ, एअरटेल, व्हीआय आणि बीएसएनएलसह सर्वांसाठी हा नियम अनिवार्य आहे. आपले माहिती सुरक्षित ठेवायची असेल तर आपला नंबर रिचार्ज ठेवणे गरजेचे आहे.




**रिलायन्स जिओ** : जर आपण जिओचे सिमकार्ड वापरत असाल, तर आपल्याला वेळोवेळी आपला नंबर रिचार्ज करून घ्यावा लागेल. जिओचे सिम रिचार्ज योजना नसतानाही ९० दिवस सक्रिय राहते. पण योजना संपल्यानंतर इनकमिंग कॉल्स एक महिना किंवा काही दिवसांतच बंद होऊ शकतात. जर आपण ९० दिवसांपेक्षा जास्त काळ रिचार्ज केला नाही, तर आपला नंबर दुसऱ्याला दिला जाऊ शकतो.

**एअरटेल** : आपल्याकडे एअरटेलचे सिमकार्ड असेल, तर तेही जिओसारखीच रिचार्ज योजना नसतानाही ९० दिवस सक्रिय राहते. या वैधतेनंतर कंपनी ग्राहकांना १५ दिवसांचा अतिरिक्त मुदत कालावधी म्हणजेच ग्रेस पिरियड देते. जर आपण या १५ दिवसांत आपला नंबर रिचार्ज केले नाही, तर तो बंद करून दुसऱ्या ग्राहकाला दिला जाईल.

**व्हीआय सिमकार्ड** : जर आपल्याकडे व्होडाफोन-आयडियाचे सिम असेल, तर तिचे नियमही जिओ आणि एअरटेलसारखेच आहेत. जर आपण आपला व्हीआय नंबर ९० दिवस रिचार्ज केला नाही, तर कंपनी तो बंद करून दुसऱ्याला देऊ शकते. आपला व्हीआय नंबर सक्रिय ठेवण्यासाठी किमान ४९ रुपयांचा प्लॅन घ्यावा लागतो.


**बीएसएनएल** : बीएसएनएलचे सिम रिचार्ज योजना नसतानाही जवळपास १८० दिवस सक्रिय राहते. खासगी कंपन्यांच्या तुलनेत सरकारी कंपनी बीएसएनएल ग्राहकांना अधिक सुविधा देत आहे. ही सुविधा त्या कोट्यवधी मोबाईल वापरकर्त्यांसाठी मोठा दिलासा आहे जे वारंवार रिचार्ज करण्याच्या त्रासात पडू इच्छित नाहीत.

◆◆◆

## चेक क्लिअरन्सची पद्धत बदलणार

भारतीय रिझर्व्ह बँकेने नुकतेच एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. ४ ऑक्टोबर २०२५ पासून चेक क्लिअरन्सची पद्धत पूर्णपणे बदलणार आहे. आतापर्यंत चेक जमा केल्यानंतर खात्यात पैसे यायला दोन दिवसांपर्यंत वेळ लागत असे. मात्र आता ही प्रक्रिया काही तासांमध्ये पूर्ण होणार आहे. या बदलामुळे व्यापारी, कर्मचारी, उद्योगधंदे करणारे तसेच सामान्य ग्राहक यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सध्या बँका चेक क्लिअर करण्यासाठी बॅच प्रोसेसिंग पद्धती वापरतात. म्हणजे एका विशिष्ट वेळी सर्व चेक स्कॅन केले जातात आणि त्यानंतर दुसऱ्या कामकाजाच्या दिवशी पैसे खात्यात येतात. पण नवीन प्रणालीमध्ये रिअल-टाईम सेटलमेंट सुरू होणार आहे. म्हणजे सकाळी १० वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत सतत चेक स्कॅन आणि प्रोसेस होतील आणि काही तासांतच खात्यात पैसे जमा होतील.



ही प्रणाली दोन टप्प्यांत लागू होणार आहे. पहिल्या टप्प्यात (४ ऑक्टोबर २०२५ ते २ जानेवारी २०२६) ज्या बँकेत चेक जमा केला जाईल त्या बँकेला त्या दिवशी संध्याकाळी ७ वाजेपर्यंत चेक पास झाला की रिजेक्ट झाला याची खात्री द्यावी लागेल. जर उत्तर मिळाले नाही, तर तो चेक आपोआप मंजूर होऊन सेटलमेंट पूर्ण होईल. दुसऱ्या टप्प्यात (३ जानेवारी २०२६ पासून) वेळ आणखी कमी होऊन फक्त तीन तास राहील.

उदाहरणार्थ, जर चेक सकाळी १० ते ११ वाजता जमा झाला, तर दुपारी २ वाजेपर्यंत त्याचे उत्तर द्यावे लागेल.

ग्राहकांसाठी हा बदल फार मोठा फायदा देणारा आहे. आतापर्यंत चेक दिल्यावर दोन दिवस वाट पाहावी लागत असे, पण आता काही तासांतच पैसे मिळणार आहेत. तसेच, सेटलमेंट पूर्ण झाल्यानंतर एका तासाच्या आत पैसे खात्यात जमा करण्याचे निर्देश आरबीआयने बँकांना दिले आहेत.

सुरक्षेच्या दृष्टीनेही हा बदल महत्त्वाचा आहे. आता चेकची मूळ प्रत हलवावी लागणार नाही, तर त्याची डिजिटल प्रतिमाच वापरली जाईल. त्यामुळे चेक हरवण्याचा किंवा फसवणुकीचा धोका कमी होईल. यामुळे बँकांचा खर्चही वाचेल.

**थोडक्यात सांगायचे तर, ४ ऑक्टोबरपासून चेक व्यवहार करणाऱ्यांसाठी बँकिंग अनुभव पूर्णपणे बदलणार आहे. ग्राहकांना पैसे मिळण्यासाठी दीर्घ प्रतीक्षा करावी लागणार नाही आणि बँकिंग सेवा अधिक गतिमान आणि विश्वासार्ह होणार आहेत.**

आरबीआयच्या या निर्णयामुळे बँकिंग प्रणाली एनईएफटी आणि आरटीजीएससारख्या डिजिटल पेमेंटस्च्या वेगाशी जुळवून घेत आहे. भारताला डिजिटल बँकिंगकडे नेणाऱ्या या उपक्रमामुळे पारदर्शकता, सुरक्षितता आणि वेग या तिन्ही गोष्टींमध्ये सुधारणा होईल.

◆◆◆

## कर्ज सोपे, भुर्दंड अधिक

आजच्या काळात देशात क्रेडिट कार्डचा वापर झपाट्याने वाढला आहे आणि यामध्ये सर्वाधिक हिस्सा तरुणांचा आहे. मोबाईल खरेदी करायची असो, प्रवासाला जायचे असो किंवा अन्य काही गरज भागवायची असो, बहुतांश तरुण लगेच क्रेडिट कार्डकडे वळतात. एवढेच नव्हे तर गरज पडल्यास थेट क्रेडिट कार्डवरून कर्ज घेण्यासही ते मागेपुढे पाहत नाहीत. मात्र या सवयीमुळे त्यांची आर्थिक




स्थिती बिघडू लागली आहे आणि हळूहळू ते कर्जाच्या जाळ्यात अडकू लागले आहेत. आर्थिक तज्ज्ञांचे मत आहे की क्रेडिट कार्डवरून कर्ज घेणे सोपे असले तरी त्यावरील व्याजाचा बोजा पेलणे अत्यंत कठीण असते. कारण अशा कर्जावर ४० ते ५० टक्क्यांपर्यंत व्याज द्यावे लागू शकते.

सामान्य खरेदीसाठी वापरल्या जाणाऱ्या क्रेडिट कार्डवर ४५ दिवसांपर्यंत व्याजमुक्त कालावधी मिळतो, परंतु कार्डवरून घेतलेल्या कर्जावर पहिल्या दिवसापासूनच व्याज आकारले जाते. क्रेडिट कार्ड खरेदीवर किमान रक्कम भरण्याची सोय असते, पण कर्जाच्या बाबतीत ठरावीक ईएमआय भरावी लागते आणि त्यामध्ये कोणतीही व्याजमुक्त मुदत नसते. त्यामुळे हा पर्याय अधिक खर्चिक ठरतो.

क्रेडिट कार्ड कर्जावरील व्याजदर साधारणपणे १८ ते २४ टक्के वार्षिक म्हणजेच ०.९९ ते १.५ टक्के मासिक दराने आकारला जातो. याशिवाय १ ते २ टक्के प्रक्रिया शुल्क घेतले जाते आणि कर्ज आगाऊ फेडल्यास ३ ते ५ टक्क्यांपर्यंत दंड आकारला जातो. उदाहरणार्थ, जर आपण १.२५ टक्के मासिक व्याजदराने एक लाख रुपयांचे कर्ज क्रेडिट कार्डवरून घेतले तर एका वर्षात सुमारे दहा हजार रुपये व्याज भरावे लागेल. याउलट, जर आपण १३ टक्के रिड्यूसिंग व्याजदराने वैयक्तिक कर्ज घेतले तर एका वर्षात केवळ सहा हजार आठशे रुपये व्याज भरावे लागेल. म्हणजेच क्रेडिट कार्डवरून घेतलेल्या कर्जावर तुम्हाला सुमारे ४० ते ५० टक्क्यांपर्यंत जादा व्याज द्यावे लागते. थोडक्यात सांगायचे तर क्रेडिट कार्ड वापर आवश्यकतेपुरते ठीक आहे, परंतु त्यावरून कर्ज घेणे हे दीर्घकालीन दृष्टीने अत्यंत महागडे ठरू शकते. त्यामुळे तरुणांनी ह्या मोहाला बळी न पडता योग्य नियोजन करून वैयक्तिक कर्जासारखे तुलनेने स्वस्त पर्याय निवडणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

◆◆◆

## अॅपलचे 'भारतप्राधान्य'

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अॅपल कंपनीला अमेरिकेतच फोन तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र अॅपल कंपनीने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. भारतातून अमेरिकेला फोन निर्यात केल्यामुळे अॅपल कंपनीच्या नफ्यावर १.१ अब्ज डॉलरचा परिणाम होण्याची शक्यता आहे.



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरोधात २५% आयात शुक लावले आहे. आणखी २५% आयात शुल्क पुढील आठवड्यापासून लागू होणार आहे. मात्र तरीही अमेरिकेतील अॅपल कंपनी आपल्या आयफोनचे उत्पादन भारतात वाढविणार असल्याचे सांगण्यात येत आहे. आयफोनचे आगामी आयफोन १७ मॉडेल पूर्णपणे भारतात तयार करण्यात येणार आहे. या अगोदर ही कंपनी भारतामध्ये अंशतः उत्पादन करीत होती. आता आयफोन १७ भारतात भारतीय बाजारपेठेबरोबरच जागतिक बाजारपेठेसाठी तयार केला जाणार आहे.

अगोदर काही फोनचे उत्पादन चीनमध्ये आणि काही फोनचे उत्पादन भारतामध्ये होत होते. मात्र आता सर्वच्या सर्व फोनचे उत्पादन भारतात करण्याचा कंपनीचा विचार असल्याचे सांगितले जाते. भारतात आयफोन तयार करणार्या पाच कंपन्या आहेत. त्या सर्वांमध्ये हे उत्पादन होणार आहे. हे उत्पादन भारतासह जागतिक बाजारपेठेसाठी पुरेसे असेल.

प्रथमच आयफोनच्या सर्व मॉडेलचे उत्पादन भारतात होणार आहे असे जागतिक वृत्तसंस्थांनी सूत्राचा हवाला देऊन सांगितले. दोन वर्षापासून अॅपल कंपनी चीनमध्ये होणारे उत्पादन भारतात हलवत आहे. अमेरिका चीनवर विसंबून राहणे कमी करणार आहे. त्याऐवजी पर्यायी बाजारपेठ म्हणून भारताला तयार करण्यात येत असल्याचे सांगण्यात येते.

टाटा समूहाचा आयफोन निर्मितीचा तामिळनाडूत प्रकल्प आहे. तर फॉक्स्वान कंपनीचा प्रकल्प बंगळुरूजवळ आहे. या दोन प्रकल्पातून जास्त उत्पादन होत असल्याचे सांगितले जाते. यावर्षी एप्रिल ते जुलै या कालावधीत आयफोन कंपनीने ७.५ अब्ज डॉलरचे फोन निर्यात केले. गेल्या संपूर्ण वर्षांमध्ये १७ अब्ज डॉलरचे फोन निर्यात केले होते.

◆◆◆

## दहा वर्षांत कोट्यधीश होण्यासाठी..

आजकालच्या तरुण जोडप्यांसमोर सर्वात मोठा प्रश्न हा असतो की त्यांनी सध्या आपला जीवनशैलीचा आनंद घ्यावा की भविष्याकरिता बचत करावी. परंतु योग्य आर्थिक नियोजन केल्यास दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य होतात. वित्तीय सल्लागार विजय महेश्वरी यांनी लिंक्डइनवर दिलेला एक आराखडा सध्या चर्चेत आहे. त्यामध्ये त्यांनी दाखवून दिले आहे की दरमहा एकूण उत्पन्न दीड लाख रुपये असलेले जोडपे आपल्या निश्चित खर्चाची पूर्तता करून उरलेली रक्कम गुंतवणुकीसाठी वापरल्यास केवळ दहा वर्षांत एक



कोटी चोवीस लाख रुपयांचा निधी तयार करू शकते.

या आराखड्यानुसार त्या जोडप्याचे मासिक उत्पन्न दीड लाख रुपये आहे. त्यातून सर्वप्रथम निश्चित खर्च वजा केला जातो. यात ३५०० रुपये आरोग्य विम्यासाठी,३५०० रुपये टर्म विम्यासाठी, सुमारे ६० हजार रुपये भाडे व घरगुती खर्चासाठी तसेच ३० हजार रुपये घर व कार कर्जाच्या हप्त्यासाठी धरले जातात. एकूण निश्चित खर्च ९७ हजार रुपयांपर्यंत होतो. त्यामुळे गुंतवणूक व बचतीसाठी ५३ हजार रुपये उरतात. या ५३ हजार रुपयांचा योग्य पद्धतीने विभाग केला जातो.१५ हजार रुपये अल्पकालीन उद्दिष्टांसाठी कर्जरोखे निधीत, पंधरा हजार रुपये मध्यम कालीन उद्दिष्टांसाठी मिश्र निधीत, २० हजार रुपये दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी समभाग आधारित गुंतवणुकीत तर तीन हजार रुपये सुरक्षिततेकरिता डिजिटल सोन्यात ठेवले जातात.

दहा वर्षांनंतर या नियोजनानुसार कर्जरोखे निधीतून सुमारे २७ लाख रुपये, मिश्र निधीतून ३३ लाख रुपये, समभाग निधीतून ५८ लाख रुपये व सोन्यातून ६ लाख रुपये. म्हणजे एकूण मिळकत अंदाजे १.२४ कोटी रुपये इतकी होते. हा आराखडा प्रभावी का ठरतो याचे कारण म्हणजे यात अल्प, मध्यम व दीर्घ अशा सर्व प्रकारच्या उद्दिष्टांची पूर्तता होत राहते. विमा असल्यामुळे आर्थिक जोखीम कमी होते. तसेच उत्पन्नाच्या फक्त ३५ टक्के रक्कम गुंतवणुकीसाठी वापरली जाते व उरलेली रक्कम दैनंदिन खर्च आणि जीवनशैलीचा आनंद घेण्यासाठी उपलब्ध राहते. थोडक्यात सांगायचे तर योग्य नियोजन, शिस्तबद्ध बचत आणि व्यवस्थित एसआयपी गुंतवणुकीच्या साहाय्याने कोणतेही जोडपे अवघ्या दहा वर्षांत कोट्यधीश होण्याच्या मार्गावर वाटचाल करू शकते.

◆◆◆

## कोणता 'स्कोर' महत्त्वाचा?

कर्ज किंवा क्रेडिट कार्ड घेताना बँक सर्वप्रथम तुमचा क्रेडिट स्कोर किंवा सिबिल स्कोर तपासते. पण, क्रेडिट स्कोर आणि सिबिल स्कोर यामध्ये नेमका फरक काय आहे? दोन्ही एकच आहेत की वेगळे? आणि कर्ज मंजूर करताना कोणता स्कोर जास्त महत्त्वाचा आहे? याबाबत सविस्तर जाणून घेऊया.

**क्रेडिट स्कोर म्हणजे काय?**

क्रेडिट स्कोर हा ३०० ते ९०० च्या मर्यादेत असणारा तीन अंकीय आकडा आहे. हा स्कोर तुमची आर्थिक विश्वासार्हता दर्शवतो, म्हणजेच तुम्ही कर्ज परतफेड करू शकाल की नाही याचा अंदाज देतो. जितका जास्त स्कोर, तितका बँकेचा तुमच्यावर विश्वास जास्त. हा स्कोर खालील घटकांवर अवलंबून असतो:

पेमेंट इतिहास: तुम्ही ईएमआय किंवा क्रेडिट कार्ड बिल वेळेवर भरता की नाही.

कर्जाची विविधता: तुमच्याकडे किती आणि कोणत्या प्रकारचे कर्ज (उदा., वैयक्तिक कर्ज, गृहकर्ज, कार कर्ज) किंवा क्रेडिट कार्ड आहेत.


नवीन कर्जासाठी अर्ज: वारंवार कर्जासाठी अर्ज केल्यास (हा हार्ड इन्क्वायरी म्हणून ओळखला जातो) स्कोरवर परिणाम होतो.

उत्पन्न-कर्ज गुणोत्तर: तुमचे उत्पन्न आणि एकूण कर्ज यांचा समतोल.

भारतात चार प्रमुख क्रेडिट ब्यूरो आहेत ज्यांना आरबीआयने मान्यता दिली आहे ह्रट्रान्सयुनियन, सिबील, एक्सपिरियन, ईक्विफॅक्स आणि सीआरआयएफ हाय मार्क. प्रत्येक ब्यूरोच्या गणनेच्या पद्धती थोड्या वेगळ्या असल्याने स्कोरमध्ये थोडा फरक जाणवू शकतो.

**महत्त्वाचा कोणता?**

अनेकांना वाटते की एक-दोन एचख चुकल्याने फारसा फरक पडत नाही. परंतु, एक छोटीशी चूकही तुमचा स्कोर खूप खाली आणू शकते. चांगला स्कोर असल्यास कर्ज किंवा क्रेडिट कार्ड स्वस्त आणि लवकर मिळते. खराब स्कोरमुळे तुम्हाला जास्त व्याजदराने कर्ज घ्यावे लागू शकते किंवा कर्ज मंजूरच होणार नाही.




**कर्जासाठी कोणता स्कोर जास्त महत्त्वाचा?**

कर्ज घेताना बँका तुमचा एकूण क्रेडिट स्कोर पाहतात, परंतु भारतात ९०% पेक्षा जास्त प्रकरणांमध्ये सिबिल स्कोरला सर्वाधिक प्राधान्य दिले जाते. जर तुमचा सिबिल स्कोर ७५० किंवा त्यापेक्षा जास्त असेल, तर कर्ज मंजूर होण्याची शक्यता खूप वाढते. इतर ब्यूरोचे स्कोर देखील उपयुक्त असतात, परंतु सिबिल स्कोरला प्रथम प्राधान्य मिळते.

कर्ज किंवा क्रेडिट कार्ड सहज मिळवण्यासाठी तुमचा सिबिल स्कोर चांगला असणे अत्यंत आवश्यक आहे. नियमित आर्थिक शिस्त आणि योग्य नियोजनाने तुम्ही तुमचा स्कोर सुधारू शकता आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवू शकता.

◆◆◆



अहिल्यानगर महानगरपालिका आणि भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

# नागरिकांनी पर्यावरणपूर्वक गणेशोत्सव साजरा करावा

## आयुक्त यशवंत डांगे यांचे आवाहन; भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व महापालिकेच्या शाळेत २१० विद्यार्थ्यांनी घडवल्या शाडू मातीच्या गणेश मूर्ती

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या पुढाकारातून व भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या संयुक्त विद्यमाने फिरोदिया हायस्कूलसह महानगरपालिकेच्या रेल्वे स्टेशन रस्त्यावरील शाळेमध्ये शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. यात दोन्ही शाळांमधील २१० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत शाडू मातीच्या गणेश मूर्ती घडवल्या. नगरकरांनी यावर्षीचा गणेश उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा, शक्य तितके शाडू–मातीच्या गणेश मूर्तींचा वापर करून उत्सव साजरा करावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिका आणि भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या वेळी प्राचार्य उल्हास दुगड, उपप्राचार्य कैलास साबळे, पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, वैभव कुलकर्णी, कल्पना पाठक, शिल्पकार बालाजी वल्लाळ, मनपाचे पर्यावरणदूत सतीश गुगळे, अध्यापक बाळासाहेब पालवे, अर्चना आळकुटे, मनिषा कांबळे आदी उपस्थित होते.

फिरोदिया हायस्कूलच्या कार्यशाळेत सुमारे ११० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत गणेशमूर्ती तयार केल्या. महानगरपालिकेच्या शाळा क्र. ४, रेल्वे स्टेशन येथेही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी अहिल्यानगर महानगरपालिकेचे स्वच्छता दूत व कला शिक्षक डॉ. अमोल बागूल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून स्वतःहून शाडू मातीच्या गणेशमूर्ती तयार केल्या.

यशवंत डांगे म्हणाले की, पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी महानगरपालिका माझी वसुंधरा अभियानांतर्गत विविध उपक्रम राबवत आहेत. गणेशोत्सवात पर्यावरणपूर्वक गणेश मूर्ती, पर्यावरणपूर्वक सजावटीचे साहित्य वापरावे. बंदी असलेल्या व पर्यावरणासाठी घातक असलेल्या प्लॅस्टिक, थर्माकोलचा वापर सजावटीसाठी करू नये, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

# 'लिटिल फ्लॉवर'च्या चिमुकल्यांची श्री गणेशोत्सवाची जय्यत तयारी

नगर – शहरातील इमारत कंपनीलगतच्या लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमधील चिमुकल्यांनी गणेशोत्सवाची केलेली जय्यत तयारी पाहून भारावूनच गेलो, असे उद्योजक आनंद मुथा म्हणाले.

लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये गणेशोत्सवाची तयारी कशी करावी? याचे सप्रात्यक्षिक मार्गदर्शन करण्यात आले. चिमुकले या मार्गदर्शनाने प्रभावित होऊन गणेशोत्सव सजावटीत रमून गेले. ते पाहून आनंद मुथा म्हणाले, लोकमान्य टिळकांनी स्वराज्य मिळविण्यासाठी सर्वांना एकत्र आणण्याकरिता गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. आज गणेशोत्सव घरा–घरांसह सार्वजनिक ठिकाणी मोठ्या उत्साहात आणि श्रध्देने साजरा केला जातो आहे. गणेशोत्सवाचा वसा पुढील पिढीकडे देण्यासाठी लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये गणेशोत्सवाची सजावट कशी करावी? हे लहानग्यांना समजावून सांगत त्यांच्याकडून लक्षवेधी सजावट करवून घेण्यात आली, हे विशेष कौतुकास्पद आहे.



लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये गणेशोत्सवाची तयारी कशी करावी? याचे सप्रात्यक्षिक मार्गदर्शन करण्यात आले.

स्कूलचे संचालक विशाल बोगावत यांनी स्कूलमध्ये प्रत्येक सणाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगण्यात येते. त्यांच्या सुप्त कला गुणांना वाव देण्यास प्राधान्य दिले जाते, असे सांगताना या स्कूलच्या आवारातच लोकमान्य टिळकांचा पुतळा असून स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच ही घोषणा टिळकांनी येथेच केली होती. टिळकांच्या या स्फूर्तीदायी परिसराचीही सुरेख सजावट करण्यात आली आहे, असे सांगितले.

# अ.भा. बहुभाषीय युवा ब्राह्मण महासंघाच्या वतीने घरबसल्या श्रीगणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्याची सोय



नगर – २७ ऑगस्ट रोजी श्रीगणेशाचे आगमन संपूर्ण भारतामध्ये होत आहे. या वर्षापासून सरकारने बाप्पांचा उत्सव हा महागणेशोत्सव म्हणून जाहीर केला आहे. सर्वसामान्यपणे प्रत्येकालाच दरवर्षी आपल्या घरी गुरुजींना बोलावून श्रीगणेशाची प्राणप्रतिष्ठा व पूजा करता येत नाही. ही आपली सर्वांची अडचण लक्षात घेऊन अखिल भारतीय बहुभाषीय युवा ब्राह्मण महासंघ, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष मंगेश निसळ यांनी फेसबुक Live च्या माध्यमातून अहिल्यानगरचे भूषण घनपाठी वेदाचार्य सागर कुलकर्णी गुरुजी यांच्या पौरोहित्याखाली यथोसांग शास्त्रशुद्ध पद्धतीने श्रीगणेशाची प्राणप्रतिष्ठा व महापूजा करण्याचे आयोजिले आहे. या पूजेसाठी यजमान सचिन जगताप हे असणार आहेत.

श्रीगणेशाची प्राणप्रतिष्ठा आणि यथोसंग पूजा २७ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजल्यापासून आपल्यापर्यंत Facebook Live च्या माध्यमातुन पोहचवली जाणार आहे. गुरुजी सांगतील त्याप्रमाणे आपणही आपली सर्व पूजा आपल्या घरबसल्या करण्याची सोय या माध्यमातून करण्यात आलेली आहे. याचा लाभ घ्यावा असे आवाहन अ.भा.ब.भा.ब्राह्मण महासंघाच्या वतीने केले आहे. Mangesh Nisal यांच्या Facebook page वर सकाळी १० वाजता लिंक सर्वांसाठी खुली करण्यात येणार आहे. या लिंक द्वारे जॉईन करावे व आपल्या बाप्पांची महापूजा वेदाचार्यांच्या अधिपत्याखाली यथोसांग करावी. त्याचप्रमाणे सर्व गणेश मंडळाचे अध्यक्ष, कार्यकर्ते, गणेशभक्त व तमाम हिंदू बांधवांना आपल्या या महाउत्सवा दरम्यान डिजेवर कर्णकर्कश आवाजात अश्लील गाणे अथवा नृत्य करून आपल्याच हिंदू सणसमारंभाचा अपमान करू नये व आपल्या या हिंदू संस्कृतीचे पावित्र्य राखावे, असे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे.

# मुलांनी स्वतःच्या हातांनी साकारला श्री गणेश

## कलर्स ड्रॉईंग अकॅडमीच्या पर्यावरणपूरक कार्यशाळेला प्रतिसाद

नगर – गुलमोहोर रोडवरील कलर्स ड्रॉईंग अकॅडमीच्या वतीने मुलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक गणपती बनवा कार्यशाळेला मुला–पालकांचा प्रतिसाद लाभला. यात सुमारे शंभर मुलांनी स्वतःच्या हातांनी गणेशमूर्ती घडवण्याचा अनुभव घेतला. माती, पाणी व चिखलाशी खेळत श्रीगणेशाला आपल्याच कल्पनेतून आकार देताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. काहींनी लहानसा गणपती बनवला, तर काहींनी आकर्षक अलंकार घालून त्याला शोभिवंत रूप दिले. पालकांनीही आपल्या चिमुकल्यांनी बनवलेल्या श्रीगणेश मूर्तीचे कौतुक करत आयोजकांचे आभार मानले.



कलर्स ड्रॉईंग अकॅडमीच्या कार्यशाळेत मातीशी खेळत बाप्पाला आकार देताना मुले.

कार्यक्रमाचे उद्घाटन अकॅडमीचे संचालक सागर उर्किडे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी सांगितले, सध्या पर्यावरण रक्षणाचे महत्त्व प्रत्येकाला जाणवू लागले आहे. प्रदूषणमुक्त सण साजरे करण्याची चळवळ समाजात वेग घेत आहे. गणेशोत्सव हे आपल्या सर्वांत मोठ्या सणांपैकी एक असून या सणात मोठ्या प्रमाणात ध्वनी व जलप्रदूषण होते. त्यामुळे शाडू मातीच्या मूर्तींचा पर्याय स्वीकारणे आवश्यक आहे. या कार्यशाळेद्वारे मुलांना बालपणापासूनच पर्यावरणपूरक सण साजरा करण्याची शिकवण मिळते तसेच त्यांच्या कलागुणांनाही प्रोत्साहन मिळते.

मोबाईलच्या आहारी गेलेल्या मुलांना कृतीयुक्त शिक्षण देण्याचा हा एक वेगळा प्रयत्न असल्याचे उर्किडे यांनी नमूद केले. छोट्या छोट्या हातांनी मातीशी खेळत बाप्पाला आकार देताना मुलांनी सर्जनशीलतेची अनोखी झलक दाखवली. गणेशोत्सवात पर्यावरणपूरक मूर्तींची स्थापना केली तर प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. हीच भावना प्रत्येक मुलामध्ये रुजविण्याचा आमचा उद्देश आहे, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यशाळेत सागर उर्किडे, सिद्धीका हिरे, पूर्वा गुप्ता, श्रीराम कुंठे, रुद्र टिपोळे, सरिता बोलकर व चिनू जोशी यांचे योगदान लाभले. कार्यशाळा संपल्यानंतर सजवलेल्या विविधरंगी व आकर्षक गणेशमूर्तींचे दर्शन घेताना उपस्थित पालक व पाहुण्यांचे डोळे आनंदाने लखलखून गेले.

# 'आपली भाषा ढोल ताशा' स्पर्धेत 'तालयोगी' ठरले महाविजेते

## गणांत द्वितीय तर रुद्रनाद तृतीय क्रमांकाने विजेते; कोहिनूर मॉलतर्फे आयोजन; सहा पथकांनी सादर केला कलाविष्कार

नगर – सावेडी उपनगरातील नगर–मनमाड रस्त्यावर असलेल्या कोहिनूर मॉलने खास गणेशोत्सवाचे औचित्य साधत 'आपली भाषा ढोल ताशा' या ढोल पथक स्पर्धेचे आयोजन २४ ऑगस्ट रोजी केले होते. या स्पर्धेत ६ ढोल पथकांनी कलाविष्कार सादर केला. स्पर्धेत तालयोगी ढोल पथकाने विजेतेपद पटकावले.

मागील काही वर्षांपासून नगर शहर हे ढोल निर्मिती व वादनाच्या क्षेत्रात महाराष्ट्रात नवी ओळख निर्माण करत आहे. ही बाब लक्षात घेत नगरमधील ढोल पथकांची ओळख महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात व्हावी तसेच सर्व ढोल पथकांना एक व्यासपीठ मिळावे यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे यंदा हे दुसरं वर्ष आहे, यावर्षी नगर जिल्ह्यासह पुणे कोपरगाव या ठिकाणांवरूनही ढोल पथक सहभागी झाले होते. ही स्पर्धा सावेडी उपनगरातील नगर–मनमाड रस्त्यावरील कोहिनूर मॉल येथे घेण्यात आली.



'आपली भाषा ढोल ताशा' स्पर्धेत 'तालयोगी'महाविजेते ठरले.

या स्पर्धेत नगरमधील तालयोगीसह हिंदवी शौर्य, गणांत, रुद्रनाद व शिवतांडव, जय तुळजा भवानी मित्र मंडळ या ढोल पथकांनी सहभाग घेतला होता. विजेत्या तालयोगीला ५१ हजार रुपये रोख व मानचिन्ह प्रदान करण्यात आले. द्वितीय क्रमांक विजेते गणांतला २१ हजार रोख व सन्मानपत्र तर तृतीय क्रमांक विजेते रुद्रनादला ११ हजार रोख व सन्मानपत्र देण्यात आले. या स्पर्धेत परीक्षक म्हणून शिवसाम्राज्य वाद्यपथकाचे अध्यक्ष अक्षय बलकवडे, गर्जना वाद्यपथकाचे राजहंस मेहेंदळे यांनी काम पाहिले.

कोहिनूरचे संचालक अश्विन गांधी यांनी गेल्या दोन वर्षांपासून नगरमधील ढोल पथकांना प्रोत्साहन देण्यासाठी, हिंदू संस्कृतीचा अभिमान व आपल्या कलेचा समृद्ध वारसा नवीन पिढीला देण्यासाठी आम्ही ही स्पर्धा आयोजित करत आहोत, पुढच्या वर्षी आणखी मोठ्या स्वरूपात ही स्पर्धा आयोजित करणार असल्याचे सांगितले.



**राज्यस्तरीय कुराश स्पर्धेत मल्हार सुरसे यशस्वी झाल्याबद्दल विशाल गणपती देवस्थानतर्फे सत्कार**

कोल्हापूर येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय कुराश स्पर्धेमध्ये अहिल्यानगरचा चि. मल्हार महेश सुरसे याने ४० किलो वजन गटामध्ये उत्कृष्ट खेळ करत कांस्यपदक पटकावल्याबद्दल त्याचा शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिर देवस्थान ट्रस्ट तर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी महंत संगमनाथ महाराज, अध्यक्ष अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, खजिनदार पांडुरंग नन्नवरे, विश्वस्त रंगनाथराव फुलसौंदर, बापूसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबिरे, नितीन पुंड, महेश सुरसे आदी.



नगरजवळ बनावट नोटांसह तिघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# बनावट नोटांसह तिघा जणांना नगरजवळ पकडले, दोघे पसार

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, ९ लाख ५७ हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर – नगर– दौंड रस्त्यावरील कायनेटीक चौकापासून पुढे हनुमान मंदिराजवळ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २४ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास सापळा रचून बनावट नोटा घेऊन आलेल्या तिघांना पकडले असून दोन व्यक्ती दुचाकी टाकून पसार झाल्या आहेत. या कारवाईत ९ लाख ५७ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक किरण कबाडी यांना माहिती मिळाली होती की, दौंडहून नगर शहराकडे एक चारचाकी आणि त्यामागे एक दुचाकी येत असून त्यामध्ये इसमांकडे बनावट नोटां आहेत. त्या माहितीनुसार त्यांनी एक पथक नियुक्त करून पंचांच्या उपस्थितीत कारवाईचे आदेश दिले.

पथकाने पहाटेच्या वेळी कायनेटीक चौकाच्या पुढे २०० मीटर अंतरावर हनुमान मंदिराजवळ सापळा लावला. संशयित वाहन थांबविण्यात आले, तर दुचाकीवरील दोघे अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. पोलिसांनी इंद्रजित बिबीशन पवार (वय २९), दीपक राजेंद्र भांडारकर (वय ३२, दोघे रा. शांतीनगर, भोसरी, ता. हवेली, जि. पुणे) व शरद सुरेश शिंदे (वय २९, रा. वरंवडी, ता. संगमनेर) यांना पकडले. तर दुचाकी टाकून पळून गेलेल्यांपैकी एकाचे नाव जितेंद्र ममता साठे (रा. वासुंदे, ता. पारनेर) असे समोर आले असून त्याच्या एका साथीदाराची अद्याप ओळख पटलेला नाही. पंचासमक्ष संशयित आरोपींची अंगझडती व वाहन तपासले असता त्यामध्ये हुबेहुब दिसणाऱ्या ५०० रूपये दराच्या नोटा व त्याखाली भारतीय बच्चो का ब ५०० रूपये असे छापलेले प्रत्येक बंडल मध्ये १०० कागदी नोटा असलेले १२ बंडल, तसेच ८८ भारतीय बच्चो का बैंक, ५०० रुपये असे छापलेले बंडल त्यातील प्रत्येक बंडलमध्ये १०० कागदी नोटा, एक चारचाकी, एक दुचाकी व चार मोबाईल असा एकुण ९ लाख ५७ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. त्यामुळे या आरोपींच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १७९, १८०, ३ (५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक हरीश भोये, अंमलदार हृदय घोडके, सुनील पवार, भिमराज खर्से, आकाश काळे, अमोल कोतकर, बाळू खेडकर, मनोज साखरे यांच्या पथकाने केली.

# 'हायजिन फर्स्ट' च्या नाट्य स्पर्धेत 'श्रीरामकृष्ण एज्युकेशन' ला प्रथम क्रमांक

नगर – सौ. वैशाली गांधी यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या हायजिन फर्स्ट या संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या आंतर शालेय नाट्य स्पर्धेमध्ये श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामअवतार मानधना ज्युनिअर कॉलेजचा अहमदनगर जिल्ह्यातील एकूण २२ शाळांमधून प्रथम क्रमांक आलेला आहे. यावेळी विद्यार्थ्यांना आरोग्याच्या दृष्टीने हायजिन असणाऱ्या वस्तूंचे बक्षिसाच्या रूपात वाटप करण्यात आले.



सेहत ही गुणवत्ता की शान स्वच्छ रसोई घर उसकी पहचान या नाटकाचे सादरीकरण विद्यालयांमध्ये करण्यात आले होते.

सेहत ही गुणवत्ता की शान स्वच्छ रसोई घर उसकी पहचान या नाटकाचे सादरीकरण विद्यालयांमध्ये करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी बाहेरचे खाणे स्वच्छ आहे की नाही याची पडताळणी कशी करावी तसेच त्याशिवाय बाहेरून कोणतेही पदार्थ त्या हॉटेलमधील किचन न पाहता मागू नयेत. हे जनजागृती करणारे नाटक सादर केले. यामध्ये विद्यालयातील एकूण वीस विद्यार्थी सहभागी झालेले होते.

या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयातील सौ. रोथेल लोंढे, सौ. मुग्धा देवकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच या नाटिकेसाठी संगीत श्रेयाकुमार गुंडू व नाटिकेसाठी लागणारे चित्र हे विद्यालयातील सौ. पूजा म्हस्के यांनी काढून दिलेले आहेत. संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष नंदकुमार झंवर, मोहनलाल मानधना, राजेश झंवर, सचिव डॉक्टर शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक व सर्व सभासद तसेच विद्यालयाच्या प्राचार्या सौ. राधिका जेऊरकर, उपप्राचार्या सौ. गगन वाधवा, समन्वयक सुषमा उजागरे व संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

## जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापणा

नगर – ग्रामदैवत असलेल्या माळीवाडा येथील श्री विशाल गणेश मंदिर येथे गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गणेश चतुर्थी दिनी २७ ऑगस्ट रोजी सकाळी ९.१५ वा. मंदिरात जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे व सौ.घार्गे यांच्या हस्ते 'श्रीं'ची विधीवतपणे प्राणप्रतिष्ठापणा होईल. याचबरोबर १० दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड.अभय आगरकर यांनी दिली.

२७ ऑगस्टला पहाटे महापुजा, प्राणप्रतिष्ठेच्यावेळी सकाळी ९ वा. 'रुद्रवंश' ढोल पथकाची मानवंदना दिली जाईल. ३ ते ५ सप्टेंबरपर्यंत चंद्रकांत सुखदेव दहिंडे परिवाराच्यावतीने श्री गणेशयाग होणार आहे. त्याचे पौरोहित्य नाशिक येथील मुकुंदशास्त्री मुळे गुरुजी करणार आहेत तसेच ३ सप्टेंबरला सकाळी ९ वा.महिलांचे आरोही ढोलपथक वादन कला सादर करणार आहेत. ५ सप्टेंबरला सकाळी ८.३० वा महिलांचे सामुहिक अथर्वशीर्ष पठण व महाआरती होईल. ६ सप्टेंबरला गणेश विसर्जन दिनी सकाळी ८.३० वा. जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया व सौ.आशिया यांच्या हस्ते उत्थापन पुजा करण्यात येऊन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात येईल. या मिरवणुकीमध्ये सुरुवातीस सनई चौघडा, युगंधर व रुद्रनाद हे दोन ढोलपथक वादन करणार आहेत. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील मैदानी खेळाचे प्रात्यक्षिक सादर केली जातील.

यावेळी ॲड.अभय आगरकर म्हणाले, गणेशोत्सवानिमित्त १० दिवसात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. भविकांच्या सोयी–सुविधांसाठी मंडप, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याचेही ॲड.आगरकर यांनी सांगितले.

गणेशोत्सव यशस्वीतेसाठी देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, बापुसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबिरे, हरीचंद्र गिरमे, ज्ञानेश्वर रासकर, प्रा.माणिक विधाते, संजय चाफे, नितिन पुंड आदिंसह श्री विशाल गणेश सेवा मंडळ व भक्तगण प्रयत्नशील आहेत.

